299

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# चिट्ठी - चिट्ठी बाँग - बाँग

द्वा. श्रृ. २९९

पा.

BVBK-0400299

२००

# चिट्टी-चिट्टी–बँग-बँग

प्रो. पॉटस् स्वतःला अफलातून संशोधक समजत. इतके अफलातून की आपल्यापुढे एडिसन् कुणीच नव्हे असे त्यांना वाटे. एडिसन्‌विषयी तुच्छता दाखवण्यासाठी त्यांनी आपल्या कुत्र्याचेच नाव एडिसन् असे ठेवले होते. प्रोफेसर मजकुरांच्या या मताशी त्यांची आईवेगळी मुले छोटा जेरेमी आणि छोटी जेमिमा दोघेही पूर्ण सहमत होते. आपले वडील एक थोर संशोधक आहेत यात त्यांना यत्किंचितही शंका नव्हती. मात्र मुलांच्या आजोबांचे आपल्या पोराचे हे सारे उपद्व्याप मूर्खपणाचे आहेत असे ठाम मत होते.

आता प्रो. चे काही प्रयोग फसले होते हे मात्र खरे. यांत्रिक वल्हयांची त्यांची नाव पाण्यात सोडल्यावर वल्ही फिरायच्या ऐवजी नावच गरगर फिरू लागली. झटपट बूट-पॉलिश यंत्राने बुटाऐवजी विजारच काळी होऊ लागली आणि शिवाय लेसमध्ये अडकून त्याचा गुंता होऊ लागला तो वेगळाच. पाव भाजायच्या यंत्रात पाव इतका खरपूस भाजून निघाला की त्याचा कोळसा झाला.

" एखाद्या दिवशी तुझ्या या उपद्व्यापात कसला तरी स्फोट होऊन सारं घर जमीनदोस्त करणार आहेस झालं. " आजोबा किरकिरत.

BVBK-0400299

आता प्रयोगशाळा म्हटली की तिथे वारकेसारखे स्फोट व्हायचेच. एखाद्या वेळी एखादी परीक्षानळी उडे. तर दुसऱ्या वेळी बॉयलर फट् म्हणे. कधीमधी त्यांनी सोडलेली रॉकेटस् मधूनच स्फोट होऊन खेड्यातील घराच्या छपरावर कोसळत आणि मग दचकलेली सारी कुत्री एकदम अशी कुत्रे-कुई उठवत की डोके उठून जाई.

एक दिवस रॉकेट आपल्याच पाठीवर बसवून आकाशात उड्डाण करायचे त्यांनी डोक्यात घेतले. घरामागच्या टेकडीवर त्यांनी चाळीस-एक फुटांचा उतार तयार केला. अंगात जाडजूड जाकीट घातले. शिरस्त्राण चढवले. उतारावरून घरंगळत वर जाण्यासाठी बुटाला चाके लावली. पाठीवर रॉकेट बसवले. त्यांच्या या हनुमान-उडीचे कौतुक पाहायला मात्र कुणीच हजर नव्हते. आजोबांना तर त्याचे हे कुठलेच खूळ पसंत नव्हते. मुलंही कुठंतरी खेळायला गेली होती. कुठं कुणास ठाऊक ! त्यांच्या या प्रयोगशाळेच्या कामात त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला सवड होईल तर ना ! आपल्या या ऐतिहासिक करामतीपूर्वी प्रो. नी घराकडे वळून पाहिले.

अंगणात जेरेमी आणि जेमिमा कुठूनतरी येऊन हजर होती. त्यांच्याबरोबर कुणीतरी एक बाईही दिसत होती. " कोण बरं असावी ती ? " प्रो. ना काळजी पडली. आपल्या शोधांची रहस्ये चोरून नेण्याच्या कामगिरीवर आलेली कुणी हेर सुंदरी तर नव्हती ना ? खरं म्हणजे इतक्या अंतरावरून ती बाई सुंदर आहे असं ठामपणे सांगता आलं नसतं; पण हेर-स्त्री सुंदर असायची असा नियमच नाही का ?

प्रो. नी मनातले हे विचलित करणारे विचार झटकून टाकले. त्यांनी हात हलवून मुलांना ' टा ऽ टा ' केले. मुलांनी आणि त्या

आगंतुक बाईनेही त्यांना प्रती ‘ टाऽटा ’ केले. प्रो. नी रॉकेट शिलगावली. थोडा वेळ रॉकेट छान चालली; पण टेकडीच्या माथ्यावर पोचल्याबरोबर ती बंद पडली. अवकाशाच्या उंबरठ्यावरच प्रो. मजकूर ठेचकाळले; पण निराश न होता त्यांनी पाठीवरच्या रॉकेटशी खटपट चालू केली. या खटपटीत ते हळूहळू ‘ अबाऊट टर्न ’ झाले हे त्यांच्या लक्षातच आले नाही.

आणि तेवढ्यात रॉकेट मिस्किलपणे चालू झाली. चालू झाली ती इतकी छान की दृष्ट लागावी. प्रो. पॉटस्ना कृतकृत्यता वाटली. पण दुसऱ्याच क्षणी त्यांच्या लक्षात आले की, आपण वर न जाता खाली – जमिनीकडे वेगाने चाललो आहोत. त्यांनी गडबडून ब्रेक लावायचा प्रयत्न केला; पण रॉकेटनी तो प्रयत्न हाणून पाडला आणि दुसऱ्याच क्षणी प्रो. साहेब घरामागच्या हिरवळीवर येऊन आदळले. एवढ्याने भागले नाही. रॉकेट चालूच होती. तिनें प्रो. ना काळचा-माळचा–भिंगोऱ्या करायला लावल्या. रॉकेटमधून निघालेल्या धुराने त्यांना गुदमरायची वेळ आणली. त्यांनी कसेवसे एक झाड पकडून ते जिवाच्या आकांताने घट्ट धरून ठेवले तेव्हा कुठे ते स्थिरावले.

इतके झाले तरी प्रो. नाउमेद झाले नाहीत. पाठीवरचे रॉकेटचे खोगीर सोडता सोडता त्यांच्या मनात विचार आला, “काही हरकत नाही. जरा चूक झाली खरी पण असं करता येईल हे तरी सिद्ध झालं की नाही ? ’ पुढच्या वेळी काय बदल करायचा आणि सावधगिरी बाळगायची हे तरी कळलं ···· ”

प्रो. ची ही विचारमाला मध्येच तुटली; कारण कुणीतरी आपल्याला सचैल स्नान घातल्याची जाणीव त्यांना झाली. हे मध्येच कोण अडमडले म्हणून त्यांनी रागारागाने पाहिले तर ती

मघाचीच बया हातात रिकामी बादली घेऊन धापा टाकत उभी होती. प्रो. ना काय बोलावे हेच कळेना. या रॉकेटचे गतियंत्र तयार करायला त्यांना किती महिने लागले होते; आणि त्याच्यावर हिने अक्षरशः पाणी फिरवले होते. पण बाईमाणसावर आणि त्यात अनोळखी, रागवायचे तरी कसे ? आणि त्यात पुनः ती बाई जे म्हणाली त्यामुळे आपण रागावलो नाही हेच बरे केले असे त्यांना वाटले.

" बरं झालं मी वेळेवर हजर होते म्हणून, नाहीतर रॉकेटच्या आगीत तुम्ही भाजून निघाला असता."

आता या अज्ञानाला हसावे की रडावे हेच त्यांना कळेना. त्यांच्यासारख्या शास्त्रज्ञाने एवढीही सावधगिरी बाळगली नसावी अशी तिची समजूत होती काय ? जळू न शकणाऱ्या ॲसबेस्टॉसच्या कपड्याची तिला काहीच माहिती दिसत नव्हती. अज्ञानी माणसाची कीव करायची असते, राग नाही. आणि शिवाय जेमिमा आणि जेरेमीने जवळ येऊन त्या बाईची शिफारस केली.

" त्यांना रागावू नका हं बाबा" ते म्हणाले, " त्यांनी आम्हांला मोटारीत बसवून आणलं."

" आणि त्यांचं नाव ट्रुली आहे बरं का." जेमिमाने माहिती पुरवली.

" खरं सांगायचं म्हणजे " ती तरुण स्त्री म्हणाली, " माझ्या गाडीखालीच यायची ही मुलं."

" अस्सं! " प्रो. विमनस्कपणे म्हणाले. त्या स्त्रीच्या सांगण्याचा अर्थ त्यांच्या मनावर नीट बिंबलाच नव्हता. आणि तो जाणून घ्यायची त्यांना विशेष इच्छाही नव्हती. खरं म्हणजे मोठेमोठे

शोध लावायचं काम पडलं असताना असल्या शिळोप्याच्या गप्पा मारण्यात त्यांना स्वारस्य नव्हते. "चालायचंच, आपल्या साऱ्यांच्याच हातून अपघात होतात." ते म्हणाले आणि मुलांना त्यांनी घराकडे पिटाळले.

"पण माझी चूक नव्हतीच मुळी." ट्रुली घुश्शात म्हणाली. प्रो. आपल्याच नादात प्रयोगशाळेकडे वळले. ती बाईही आपल्या पाठोपाठ येते आहे हे त्यांना दिसले. ही बया आपला पिच्छा का सोडत नाही हेच त्यांना कळेना. कुणाला काही इजा झाली नाही ना, मग चूक कुणाची होती याची घटपटादी चर्चा करण्यात काय अर्थ होता !

तिच्याकडे दुर्लक्ष करून आपला पसारा आवरून प्रो. पॉटस् प्रयोगशाळेत शिरले.

इथं कसं प्रसन्न होतं सारं ! चाकांची घरघर चालू होती. निरनिराळ्या बाकांवर यंत्रे खटखटत होती. वंगणाचा, यंत्रांचा आणि लाकडाचा मस्त वास सुटलेला होता.

प्रो. नी त्या गर्दीतच थोडीशी सरकासरकव करून रॉकेटचा पसारा तिथे टाकला.

"मि. पॉटस् –"

म्हणजे ही बया इथंही आली तर !

"काय म्हणता ?" प्रो. नी नाखुशीनेच आणि यंत्राशी काही-तरी खाटखूट करतच विचारले.

"अहो, तुमची मुलं रस्त्यावर भटकत होती."

"तेवढं ते तुमच्या मागचं बटन दावता का ?" प्रो. म्हणाले.

ट्रुलीने दातओठ खात बटन दाबले. आधीच्याच घरघरीत अजून भर पडली.

"मुलांना जरा शिस्त लावायला हवी तुम्ही. अहो, चक्क शिवाशिवी खेळत होते दोघं रस्त्यावर. एकदम माझ्या गाडीपुढं आले. मला चटकन गाडी वळवावी लागली. ती गेली थेट डबक्यात."

"अरेच्या, असं झालं म्हणता? मग मोठीच मजा आली असेल नाही?" प्रो. गालातल्या गालात हसत म्हणाले.

ट्रुली रागाने लालबुंद झाली. तिला काय बोलावे हेच कळेना.

"नाही म्हणजे मुलं अशी भटकू देणं बरं नाही." ती कशी-बशी म्हणाली.

"ठीक आहे. ठीक आहे." प्रो. म्हणाले, "मी त्यांना आता साखळीनं बांधून घालीन याच्यापुढं बरं का?"

ट्रुलीने निराशेने मान हलवली. अशा माणसाशी या विषया-वर बोलण्यात काहीच अर्थ नव्हता.

तिनं मग त्यांना प्रयोगशाळेतल्या यंत्रांविषयी माहिती विचारायला सुरवात केली. हे काय आहे? गालिचे साफ करायचं यंत्र हे? केस कापायचं यंत्र हे? लिमलेट बनवायचं यंत्र?

प्रो. नी यंत्र चालू केले.

यंत्रातून एक गोळी बाहेर पडली. ती ट्रुलीने कुतुहलाने उचलली. "पण काय हो," तिने निष्पापपणे विचारले, "या गोळीला हे भोक कशाला ठेवलय् मधे?"

आजोबांनी वर्तवलेला स्फोट झाला; पण तो प्रो.च्या डोक्यात. मघाशी तिनं असाच एक प्रश्न विचारला होता. "काहो प्रो.

तुम्ही नुसते शोधच लावता का?" स्त्री-दाक्षिण्य म्हणून प्रो. नी त्याच्याकडे दुर्लक्ष केले होते; पण आता –

"तुमच्या साखरेचा उत्कलन-बिंदू बराच जास्त असावा–" ट्रुली म्हणत होती.

"हो आहे ठाऊक मला." प्रो. गरजले, "तुम्ही मिठाई-तज्ज्ञ आहात आणि बालसंगोपन-तज्ज्ञ आहात हेही; पण माझी मिठाई कशी असावी आणि माझ्या मुलांनी कसं वागावं याची पंचाईत करायचं काही कारण नाही तुम्हाला."

"अहो – पण –" ट्रुलीने बोलायचा प्रयत्न केला.

"आता पण नको नि परंतु नको. आता चला इथून माझे आई." ते हात जोडून म्हणाले, "सांभाळा ती वायर."

पण केस कापायच्या यंत्राच्या वायरला ट्रुली अडखळलीच. मशीनच पडायचे. प्रो. नी ट्रुलीकडे दुर्लक्ष करून मशीन सांभाळले.

ट्रुली दाणदाण पावले आपटत बाहेर गेली आणि तिने मोटारमध्ये बसून स्टार्टर दाबला.

"फुर्रर्. " आवाज करून गाडी बंद पडली.

ती खरोखर गेली की नाही हे पाहण्याकरता प्रो. दारापर्यंत आले होते. त्यांनी ते पाहिले. तिची दया येण्यापेक्षा माझ्यासारखा यंत्रज्ञ हजर असताना गाडी बंद पडते म्हणजे काय हे आव्हानच त्यांना जास्त वाटले. आत एवढा प्रचार झाल्यावर मोटारकडे बघा म्हणायचे ट्रुलीच्या जिवावर आले; पण प्रो. नी पुढे होऊन गाडीच्या एंजिनशी थोडीशी खाडखूड करताच गाडी आपसूक वळणावर येऊन मुकाट्याने सुरू झाली.

रात्री जेवणाच्या वेळी सगळे कसे व्यवस्थित चालले होते! अंडी फोडण्याच्या आणि ऑम्लेट बनविण्याच्या यंत्रांनी दृष्ट लागेल असं आज्ञाधारक वर्तन केले. अंड्यांची टरफले किंवा त्यातले बलक घरभर उधळण्याचा मिस्किलपणा त्यांनी केला नव्हता. सर्वजण चवीने जेवत होते.

तरीपण काहीतरी बिनसले असल्याची स्पष्ट जाणीव प्रो. ना झाली. त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले तेव्हा जेरेमी आणि जेमिमा नेहमीपेक्षा जास्त गंभीर असलेली त्यांना आढळली. एरवी त्यांची तोंडे खाण्यापेक्षा बोलण्यातच जास्त गुंतलेली असत आणि त्यांना वारंवार खाण्याबद्दल आठवण द्यावी लागत असे.

"काय रे पोरांनो, आज असे गप्प गप्पसे का?" प्रो. नी विचारले.

"काही नाही, बाबा." दोन्ही पोरांनी एका सुरात उत्तर दिले; पण त्यांच्या बोलण्यात जीव नव्हता.

"मला फसवू नका." प्रो. प्रेमळ रागीटपणे म्हणाले, "तुम्हांला काहीतरी सांगायचं दिसतंय्. होय ना."

जेमिमाचा चेहरा रडवेला झाला. जेरेमीने तिला दाबायचा प्रयत्न केला; पण तिला बोलल्याशिवाय राहवेना.

"बाबा, गॅरेजवाले कॉगिन्सकाका ती मोटार मोडवाल्याला देऊन टाकणार." ती रडवेल्या आवाजात म्हणाली.

"आणि तो मोडवाला ती भट्टीत घालून टाकणार आहे." जेरेमीने आपले अश्रू आवरत माहिती पुरवली.

"मोटार? कुठली मोटार?" प्रो. ना काही आठवेना. त्यांनी स्मृतीला ताण दिला आणि मग त्यांना चटकन आठवले.

मि. कॉगिन्सच्या परसात वाढलेल्या झाडोऱ्यात एक जुनी मोटार गंजत पडली होती तिच्याबद्दल मुले बोलत होती. ती रेसिंग कार होती आणि नवी असताना तिने अनेक रेस जिंकल्या होत्या असं म्हणत; पण आता तिच्या म्हातारपणी तिच्या नशिबी हे असे एका कोपऱ्यात पडणे आले होते. पण मुलांचे मन तिच्यावर बसलेले होते. त्यांच्या स्वप्नसृष्टीत त्यांनी कितीदातरी तिच्यात बसून रेसची मैदाने गाजवलेली होती.

"छे: ! छे: ! भलतंच काहीतरी." प्रो. उघडपणे म्हणाले,

"असं होऊ देता कामा नये."

"वाटलंच आम्हांला." जेमिमा टाळ्या पिटत म्हणाली.

"तुम्ही कॉगिन्सकाकाला तसं काही करू देणार नाही."

"पण हे व्हावं कसं ?" प्रो. पहिल्या उत्साहाचा भर ओसरल्यावर म्हणाले, "मि. कॉगिन्सचा धंदा आहे तो. आपलं कसं ऐकेल तो ?"

"ते सोपं आहे." जेरेमी उत्साहाने म्हणाला, "आपण त्याला फक्त तीस शिलिंग दिले तर तो ती गाडी आपल्याला देऊनच टाकील."

"आम्ही कबूलच करून घेतलं त्याच्याकडून." जेमिमा म्हणाली.

"उद्या सकाळी पैसे दिलेत तरी चालतील." जेरेमीने खुलासा केला.

प्रो.च्या घशात घास अडकला. तीस शिलिंग लांब राहिले, आपल्या खिशात तीस फुटके पेन्सही नाहीत हे मुलांना कसे सांगावे

हा प्रश्न त्यांना पडला. पण मुलांच्या चेहऱ्याकडे पाहताच त्यांना नाही म्हणायला त्यांची जीभ उचलेना.

" हात्तेच्या ! एवढंच ना. आपण उद्या देऊन टाकूया त्याला तीस शिलिंग. " प्रो. उसन्या अवसानाने म्हणाले.

मात्र मुले झोपायला गेल्यावर हे प्रत्यक्षात आणणे किती कठीण आहे याची जाणीव त्यांना झाली. आपले खिसे रिकामे आहेत हे चांगले ठाऊक असूनही त्यांनी एकवार खिसे उलटे करून पाहिले. पण अपेक्षप्रमाणेच त्यात काहीच नव्हते. नंतर अपराधीपणाने त्यांनी आपला मोर्चा घरातल्या बचत-पेटीकडे वळवला. नडी-अडचणीला लागेल म्हणून तिच्यात ते पै-पावआणा टाकत आले होते. त्यांनी पेटी उघडून किती शिल्लक साठली आहे हे मोजून पाहिले. त्यांच्या अंदाजाप्रमाणे ११–१२ शिलिंगतरी असायला हवे होते; पण पेटीत जेमतेम ५–६ शिलिंग होते त्या अर्थी मुलांच्या आजोबांनी पेटीतून पैसे काढून घतले होते हे उघड होते. त्यांना विचारले तर मी नंतर ते त्यात ठेवणारच होतो असे त्यांचे उत्तर ठरलेले होते. फक्त ही नंतर केव्हा येणार हाच प्रश्न होता. बाकी त्यांनी तसे पैसे काढून घेतले नसते तरी ११–१२ शिलिंगनी प्रश्न सुटला नसताच. बरं आपल्या घराला आग लागली तरी त्याच्यावर कुणी चिलीम पेटवायला विस्तव मागितला तरी तोसुद्धा न देणाऱ्याच्या जातीतला मि. कॉगिन्स होता. त्याला हप्त्याहप्त्याने पैसे देईन अशी गळ घालण्यात अर्थ नव्हता.

प्रो. विषण्ण झाले.

ही विषण्णता घालवायचा एकमेव उपाय म्हणजे प्रयोगशाळेत जाणे. पत्नी निवर्तल्यापासून तेवढाच एक विरंगुळा त्यांना होता.

आपल्याला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर तेथेच मिळेल असा त्यांना विश्वास होता. आणि तिथे नाही मिळाले तर या पेचप्रसंगावर तोडच नाही असे म्हणायला हरकत नव्हती.

ते वर्कशॉपमध्ये गेले.

वर्कशॉपमध्ये प्रो.चा कुत्रा एडिसन् पसरलेला होता. त्याच्या अस्ताव्यस्त पसरण्याने इतकी मोठी जागा अडली होती. प्रो. त्याला हडहड करून बाहेर हाकलण्याच्या विचारात होते.

तेवढ्यात एडिसन्‌ने त्यांच्याकडे पाहात चक्क शीळ घातली.

प्रो. आ वासून पाहात राहिले.

एडिसन् लिमलेट चघळत होता. ती गोळी त्यांच्या मिठाई-यंत्रातून पडलेली असावी — मधे भोक असलेली.

एडिसन्‌ने गोळी चघळली.

पुन: शीळ ऐकू आली.

प्रो. गुडघे टेकून बसले आणि त्यांनी त्या घटनेचे नीट निरीक्षण केले.

" मिठाई जो खा भी सकते है और सीटी भी बजा सकते है. "

प्रो. नी चुटकी वाजवली.

✦ ✦ ✦

अक्कलवंताला कशाची वाण पडणार ? हाताशी हा एवढा पृथ्वीमोलाचा शोध असताना चिंता करण्याची काय जरुरी होती ? त्यांचा हा शोध विकत घेण्याकरता मिठाई कारखानदारांच्या उड्यावर उड्या पडतील — फक्त त्यांना दाखवायचा अवकाश !

पण प्रो. ना प्रत्यक्ष अनुभव विचित्रच आला.

एवढा क्रांतिकारक शोध घेऊन ते लॉर्ड स्क्रंप्शस यांच्या कारखान्यात गेले तर त्यांना गेटवरच अडवण्यात आले.

'लॉर्डसाहेब प्रथम भेट ठरवल्याशिवाय कुणाची गाठ घेत नाहीत.' असे रूक्ष कारण त्यांना देण्यात आले. या 'दारी' कामधेनू आली तर गोठ्यात जागा नाही म्हणून तिला बाहेरच्या बाहेर पिटाळून लावणाऱ्या नतद्रष्टपणाला काय म्हणावे हेच प्रो. ना समजेना आणि ही जखम काय कमी होती म्हणूनच की काय त्या वेळी ती ट्रुली बया तिथे उपस्थित झाली. ही बया आपला पिच्छा का पुरवते आहे हे त्यांना समजेना. ते तिला चकवून जाण्याच्या विचारात होते तेवढ्यात तिनें त्यांना हटकलेच.

"काय मि. पॉटस्, बाबांच्याकडे काही काम घेऊन आला होता वाटतं ?" तिने खवचटपणे विचारले असे प्रो. ना वाटले.

"बाबा !"

म्हणजे लॉर्ड स्क्रंप्शस हिचे वडील का काय ? मग तर साराच कारभार संपला. गेटचा अडथळा कसाबसा ओलांडून लॉर्डसाहेबांपर्यंत समजा पोचलो तरी ही ट्रुली तिथं असल्यावर काम होण्याची सुतराम आशा नको.

परंतु ती ट्रुलीबाई एवढ्यातच त्यांचा पिच्छा सोडायला तयार नव्हती. काल त्यांनी तिच्या केलेल्या अपमानाची वक्रोक्तीने भरपाई करण्यासाठीच की काय तिने मोठेपणाचा आव आणून मॅनेजरच्या निषेधाला न जुमानता प्रो. ची लॉर्डसाहेबांशी भेट होण्याची व्यवस्था केली – तीही आपली स्वतःची त्यांच्याशी असलेली अॅपाइंटमेंट रद्द करून !

प्रो. चा चडफडाट झाला; पण त्यांना नाही म्हणणेही शक्य नव्हते.

परंतु उंबऱ्यावरच त्यांना अडथळा आणणाऱ्या दुर्दैवाने त्यांची पाठ चेंबरमध्येही सोडली नाही.

आपल्या मुलीची वाट पाहात असणाऱ्या लॉर्डसाहेबांना हा बाप्या मधेच उपटल्याचा राग आला; पण पोरीचा आग्रह म्हणून त्यांनी त्याचे म्हणणे गुरगुरत का होईना ऐकून घ्यायचे ठरवले. प्रो. नी आपल्या मिठाईचे गुणवर्णन जातिवंत विक्रेत्याला लाजवील अशा भाषेत करून सांगितले; पण तिच्या गुणाचा वस्तुपाठ देण्यासाठी त्यांनी ती गोळी धरून फुंकली – आणि त्याच वेळी काही कारणाने कारखान्याचा भोंगा कर्कश आवाजात वाजायला सुरुवात झाली.

गोळीची शिट्टी खुद्द प्रो. ना स्वतःलाही ऐकू आली नाही. मग लॉर्डसाहेब दूरच राहिले.

"झालं तुमचं सांगणं ?" लॉर्डसाहेब उठत म्हणाले, "या आपण आता."

त्या शोधाचे वैशिष्टय़ त्यांच्यावर ठसलेच नव्हते. प्रो. निराश झाले.

पण त्यांनी चिकाटी सोडली नाही किंवा ट्रुलीने त्यांना दटावून सोडू दिली नाही असं म्हणणं जास्त सयुक्तिक होईल. लॉर्डसाहेब कारखान्यात फेरीला निघाले तेव्हा प्रो. आपल्या मिठाईचे गुणवर्णन करीत त्यांच्या पाठीशी लागले. अर्थात लॉर्ड-साहेबांचे त्यांच्याकडे विशेष लक्ष नव्हते. पुनः एकदा त्या गोळीचे वैशिष्टय़ पटवून देण्याकरता प्रो. नी ती तोंडाशी धरून प्राणपणाने फुंकली.

या वेळी मात्र ती शीळ भिरभिरत सर्वत्र पसरली. लॉर्डसाहेब-सुद्धा क्षणभर भारावल्यासारखे दिसले.

पण दुसऱ्याच क्षणी प्रो. चे जुने मित्र कुत्रेमंडळींनी त्या शिळेला प्रतिसाद द्यायला प्रारंभ केला. एक म्हणता दुसरे, दुसरे म्हणता तिसरे असे करता करता सर्वत्र एकच कुत्रे-कुई सुरू झाली. लॉर्ड-साहेब वैतागल्यासारखे दिसू लागले.

पण हा अपरोक्ष वैताग कमी होता म्हणूनच की काय कुत्रे-मंडळींनी शिट्टीच्या अनुरोधाने सरळ कारखान्यावर चाल केली. त्यांनी खिडकीतून, दारातून, सज्जातून उड्या मारल्या त्या सरळ मिठाईच्या द्रावणाच्या कढयांत. आणि मग काय हलकल्लोळ उडाला असेल त्याची कल्पना केलेली बरी. इसापनीतीतल्या कोल्ह्याच्या या भावंडांनी लाडात येऊन लॉर्डसाहेबांभोवती गोंडा घोळण्यास सुरवात केली. एका धिप्पाड दांडगेधराने तर सरळ त्यांच्या कुशीत बसण्याची धडपड सुरू केली.

" प-प-पळा. पोलिस पोलिस. फायरब्रिगेड फायरब्रिगेड. " ओरडत लॉर्डसाहेब साऱ्या कारखानाभर थयथयाट करू लागले.

अशा परिस्थितीत 'सर सलामत तो ग्राहक पचास' हा योग्य बोध घेऊन प्रो. नी तेथून यःपलायन केले हेच बरे केले.

पण घरी आल्यावर पुनः पहिला प्रश्न दत्त म्हणून पुढे उभा राहिला. लॉर्डसाहेबांनी लठ्ठ चेक देऊन शोध विकत घेतला नाही तो नाहीच; पण निदान एखादी बॉक्स स्वतःसाठी घेतली असती तरी थोडासा प्रश्न सुटला असता; पण तेही होणे नव्हते. प्रो.नी मन घट्ट केले. मुलांना भलती आशा लावण्यात अर्थ नव्हता. त्यांना सारे स्पष्ट सांगून टाकावे हे बरे.

त्यांनी मुलांना जवळ घेऊन, आवंढा गिळून त्यांना कसेबसे समजावून सांगितले.

"हात्तेच्या बाबा, एवढंच ना? त्या मोटारीचं काय एवढं घेऊन बसलात. नाही तर नाही." जेरेमी आणि जेमिमा वयाला न शोभणाऱ्या समजूतदारपणे म्हणाले. प्रो. ना गहिवरून आले. आपल्या भणंगपणाचा त्यांना कधी नव्हे तितका आज वीट आला. त्यांच्या बछड्यांनी एवढ्यावरच मजल थांबवली नाही तर उलट आपल्याच संग्रहातील अमूल्य वस्तू देऊन वडिलांच्या संशोधन-कार्याला साहाय्य करण्याची तयारी दर्शविली. प्रो. रडायचेच तेवढे बाकी राहिले. मुलांना काय ठाऊक की, त्यांच्या बालसृष्टीतल्या पृथ्वीमोलाच्या गोष्टींची – फुटक्या काचा, गंज चढलेले लोखंडाचे तुकडे, शिंगे – खरी किंमत कळण्याची पात्रता या रूक्ष, मठ्ठड व्यवहारी जगात नाही.

पण काही झालं तरी तीस शिलिंगची सोय व्हायलाच हवी. व्हायलाच हवी.

✦ ✦ ✦

व्हायलाच हवी हे खरं; पण हवेतून पैसे निर्माण करण्याचा तर शोध अजून लागला नव्हता. या शक्यतेवर सुद्धा गंभीरपणे विचार करायला हवा.

प्रो. पवनचक्कीला टेकून विमनस्कपणे बसले होतें.

खाली खेड्यातल्या हिरवळीवर भरलेल्या जत्रेचे आवाज अधून-मधून वाऱ्यावर कानावर येत होतें. चाकू-कात्रीला धार लावणारे, कुडमुडे वैदू, ज्योतिषी, जादूगार, पाळणावाले असे सरमिसळ नाद होतें. प्रो. यांत्रिकपणे ते आवाज ऐकत होते एवढेच. त्यांना त्यांच्या तंद्रीतून हलवून कोणी उठवले असते आणि शपथेवर विचारले असतें तर आपण काय ऐकले हे त्यांना मुळीच सांगता आलें नसते.

आपल्या धन्याला असा उदास बसलेला पाहून एडिसन् त्यांच्याजवळ येऊन बसला. प्रो. नी सवयीने त्याच्या अंगावर हात फिरवला. त्या अवस्थेतही त्यांना एडिसन्‌च्या अंगावरचे केस फार वाढले आहेत ते एकदा काढून टाकायला हवेत अशी जाणीव झाली.

– आणि कुठंतरी आत घंटा वाजली.

केस कापणे !

प्रो. ताडकन उठले. एडिसन्‌ला आपल्या धन्याच्या एकाएकी काय अंगात आले ते कळेना. तो वाकडी मान करून त्यांच्याकडे पाहू लागला.

प्रो. खरंच संचार झाल्यासारखे प्रयोगशाळेत गेले आणि त्यांनी आपले यंत्र-क्रमांक २५३–अ वाहेर काढून सायकलच्या कॅरियरवर चढवले.

हे यंत्र म्हणजे त्यांच्या आपोआप गवत कापण्याच्या क्रमांक २५३ यंत्राची सुधारून वाढवलेली आवृत्ती होती – माणसांचे केस कापण्यासाठी – आपोआप.

एवढी जत्रा असल्यावर आणि असे अफलातून यंत्र जवळ असताना पैशाची काळजी करायचे काय कारण होते ! यांत्रिक नापिताकडून आपली हजामत करून घेण्यासाठी येणारे लोक एकमेकांच्या पायांत अडकून पडतील एवढी गर्दी करतील.

त्यांनी सायकल जत्रेकडे दामटली.

पण प्रत्यक्ष जत्रेत गेल्यावर त्यांना वेगळाच अनुभव आला. लोक कुतुहलाने त्यांच्यापाशी येत; पण ते सारे मूर्ख लोक यांत्रिक पद्धतीने, बिनधोक, सुलभ रीतीने केस कापून घेण्यापेक्षा नापिता-

कडून खरडपट्टी करून, त्याच्या वस्तऱ्याचे धाव शिरोधार्य करण्यातच आनंद मानणारे होते.

शेवटी हिप्पीसारखे लांबचलांब केस असलेला एक आडदांड गडी मोठ्या मुश्किलीने यांत्रिक शिरस्त्राणात आपले डोके अडकवून घ्यायला कसाबसा सिद्ध झाला.

प्रो.नी मोठ्या उत्साहाने त्याला ती यंत्र-टोपी घातली आणि पायटे मारून मशीन सुरू केले. प्रथम थोडा वेळ यंत्र सुरळीत चालले; पण मग त्याच्या काय अंगात आले कुणास ठाऊक !

" मेलो, मेलो. ही टोपी काढा. माझ्या डोक्याला आग लागली आहे. " तो पैलवान गडी ओरडून हातपाय झाडू लागला.

प्रो.नी अचंब्याने यंत्र बंद करून त्या गड्याला चुचकारत त्याच्या डोक्यावरची टोपी काढली. टोपी इतकी गरम झाली होती की त्यांचा हातच भाजला तेव्हा प्रो. चरकले.

पण हिप्पीसारखे केस असलेल्या त्या पैलवानाच्या डोक्यावर एकही केस राहिला नव्हता. अगदी तुळतुळीत गोटा माथेरान झालेले त्यांनी पाहिले तेव्हा ते खरे चरकले.

सिंहाच्या तोंडात मान देणाऱ्या खेळाडूचे कौतुक पाहायला जमलेल्या लोकांनी पैलवानाची 'ए टकल्या' म्हणून हुर्रेवडी उडवायला सुरवात केली.

पैलवान एक हिंस्र डुरकणी फोडून प्रो.च्या मागे लागला. प्रो. सायकल व आपला अपूर्व शोध तसाच टाकून जीव घेऊन पळाले. त्या शिवाशिवीच्या खेळात साऱ्या जत्रेत हाहाःकार उडाला. कुडमुड्या जोश्याच्या तंबूतून ही जोडी पळत पळत आरपार झाली तेव्हा आपण न वर्तवलेले हे भविष्य कसे घडून आले याचे कोडे

त्यांना पडले. त्यांनी पूर्ण वेगात असलेल्या पाळण्यात एका मागून एकाने प्रवेश केला आणि तशाच उड्या टाकल्या तेव्हा पाळणा-वाल्याचे ब्रेक दावता दाबता हृदयच बंद पडेल असे वाटले.

पण प्रो. पॉटस्‌चा पैलवानापुढे किती वेळ पाडाव लागणार ? त्यांच्यातले अंतर कमी-कमी होत चालले होते.

कमी ! आणखी कमी ! !

प्रो. समोर दिसलेल्या तंबूत शिरले. तो एक रंगपट होता. नृत्यकार-वृंद नाचण्यासाठी कपडे बदलत होते.

मिसळून जाण्यासाठी हे ठिकाण आदर्श होते; पण स्टेजवर नाचता कसे येणार ? परंतु प्रो. ना हा विचार करायला वेळच मिळाला नाही. घंटा झाली आणि ते त्या समूहाबरोबर स्टेजवर ढकलले गेले.

नाचाला सुरवात झाली. आरंभाला पुढच्याचे बघून जमेल तशी वेडीवाकडी पावले त्यांनी टाकली; पण थोड्याच वेळात त्यांच्या ध्यानात आले की, नाच म्हणजे दुसरे तिसरे काही नसून पायांच्या हालचाली गणिताच्या नियमानुसार करणे होय. मग काय हवे होते. त्यांनी लय लक्षात घेतली आणि त्या नर्तकापेक्षा तेच अधिक चांगले नाचू लागले. प्रेक्षकांनाही त्यांचा नाच पसंत पडला याची पावती त्यांना वारंवार होणाऱ्या टाळ्यांच्या कड-कडाटातून मिळाली. नाच संपला तेव्हा थिएटरच्या मालकाने येऊन त्यांना घट्ट मिठीच मारली.

" बस, बस दोस्त, आज तूने कमाल कर दिया. " तो आनंदाने ओरडून म्हणाला, " अरे आज तुझ्यामुळं दौलतजादा किती जमा झाली आहे ती पाहिलीस का ? " त्याने नाण्यांनी गच्च भरलेली आपली हॅट त्याच्यापुढे धरली. " हे अगदी रेकॉर्डब्रेक झालं. "

" घे. दोस्त घे." त्याने बचकभर नाणी काढून प्रो. च्या हातात कोंबली.

प्रो. नी नाणी मोजायला सुरवात केली. मालक 'आ' वासून पाहातच राहिला.

" दोस्त, आम्ही तुला फसवू असं वाटलं तरी कसं तुला?" तो नाराजीने म्हणाला; पण प्रो.चे त्याच्या बोलण्याकडे लक्षच नव्हते. त्यांनी मोजून तीस शिलिंग बाजूला केले आणि बाकीचे पैसे मालकाला परत केले. मालकाच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

" मला एवढेच पुरे." प्रो. म्हणाले आणि मालकाच्या विनंतीला न जुमानता तेथून सटकले.

तंबूबाहेर पैलवान दबा धरून तर बसला नाही ना याची त्यांनी खात्री केली आणि मग सावधपणे आपली सायकल घेऊन त्यांनी घराकडे मोर्चा वळवला.

◆ ◆

दुसऱ्या दिवशी सकाळी मि. कॉगिन्स उठायच्या आतच प्रो. त्याच्या दारात जाऊन हजर झाले. बोहनीच्या प्रहरी इतक्या कंडम गाडीला गिऱ्हाईक चालत आलेले पाहून त्याला आनंद झाला. त्याने त्या गाडीला घोडा जोडला आणि अशा रीतीने अक्षरशः एका अश्वशक्तीवर ती गाडी चालू लागली.

चालताना गाडी कुरकुरू लागली. ढिला पडलेला पंखा वारंवार आपटून खणखण करू लागला. चाके कण्हू लागली आणि चासी तर एकाच वेळी निरनिराळ्या पट्टींत करकरू लागली; पण कशी का होईना गाडी जागची हलली तर खरी. आपले घर

दृष्टिपथात आले तसा प्रो. नी गाडीचा हॉर्न जोरात वाजवला. गाडीत बाकी काहीही असले तरी तिचा हॉर्न मात्र ठणठणीत होता.

हॉर्नचा आवाज ऐकताच जेरेमी आणि जेमिमा पवनचक्कीच्या गच्चीवर दिसली. इतक्या लांबून ती दोघे काय बोलत आहेत हे ऐकू जरी येत नव्हते तरी त्यांच्या फुललेल्या चेहऱ्यावरून ते सहज समजू शकत होते. दुसऱ्याच क्षणी ती दोघंही गच्चीवरून दिसेनाशी झाली आणि मग थोड्याच वेळात गाडीकडे धावत येताना दिसली.

त्यांना ती गाडी कुठं ठेवू आणि कुठं नको असे झाले. गाडीच्या बॉनेटवर त्यांनी चक्क लोळायला सुरवात केली.

मुलांच्या बरोबर आजोबाही बाहेर आले. त्यांना मात्र काही पसंत पडले नाही.

"कुठला खटारा उचलून आणला आहेस हा कुणास ठाऊक?" ते म्हणाले.

"हिला जरा ठाकठीक करायला हवं हे खरं." प्रो. म्हणाले, "पण एंजिन मस्त आहे अजून." असं म्हणून त्यांनी बॉनेट उघडले. तर आत कबुतरांनी घर केले होते. ती भुर्रकन उडून गेली.

"बाबा, तुम्ही तिला नीट करू शकाल नाही का ?" जेमिमाने विचारले.

"अग वेडे, हे काय विचारणं झालं ? बाबा काहीही करू शकतात." जेरेमी अभिमानाने म्हणाला.

प्रो. ना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

"करू या ना आपण तिला नीट." ते म्हणाले, "हं आता सगळेजण जरा हात लावा. आपण तिला गॅरेजमध्ये ठेवूया आधी."

गाडी गॅरेजमध्ये ठेवल्यावर प्रो.नी तिची पाहणी केली. गाडी दिसायला तर सुरेख होती. इतकी सुंदर गाडी त्यांनी आजवर कधी पाहिली नव्हती. आता गाडीचा एक हेडलॅम्प थोडा वाकडा झाला होता. हळुवार हातांनी त्यांनी तो सरळ करायचा प्रयत्न केला तर पंखाच निखळून आला. कुछ हर्ज नहीं. इसको ठीक बनाकर ही रहेंगे ! त्यांनी हातोडा घेतला. वर्कशॉपच्या पसाऱ्यातून एक ब्लो-लॅम्प आणला. थोडंसं वेल्डिंग करायला हवं होतं. थोडीशी ठाकठोक, थोडंसं रंगकाम. गिअरबॉक्सकडेही जरा पाहायला हवं होतं. गाडी स्टार्ट करायला लागलं की ती खाली पडायची; आणि झालंच तर काहीतरी खास सोयीही करायला पाहिजेतच. नाहीतरी ही गाडी कुणी लुंगीसुंगी नव्हती. यापुढेही असणार नाही.

मुलांचा आपल्यावरचा विश्वास टिकवायला हवा होता. "बाबांना काहीच अशक्य नाही."

या जिद्दीने दिवसरात्र श्रमून प्रो.नी गाडी लखलखीत केली.

"तुमचा बाप काम करत असताना तुम्ही तिकडं फिरकूसुद्धा नका." अशी आजोबांनी ताकीद दिली असल्याने मुलांची उत्कंठा दिवसेंदिवस अगदी शिगेला पोहोचली होती. प्रो. गाडी गॅरेजच्या बाहेर काढण्याचीच वाट पोरे पाहात होती. त्यांनी चमचम चमकणारी गाडी घराच्या दारात आणून उभी केली. मुले धावतच आली.

"अय्या, किती छान आहे आपली गाडी !" जेमिमाच्या डोळ्यात कौतुक मावत नव्हते.

"बाबा, तुम्ही किती हुशार आहात." जेरेमी अभिमानाने त्यांना म्हणाला.

म. प्र. [illegible] शाखा,
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९९ दिनांक (२१)
विषय किशोर क्र. २५६

" आपण गाडीतून चक्कर मारायला जाऊ या का ?" जेरेमी आणि जेमिमाने उत्कंठेने विचारले.

" चला कुठंही. बसा आत."

मुले आनंदाने आत चढून बसली.

" आपण समुद्रकिनाऱ्यावर जाऊ या का ? जाऊच या गडे." जेमिमा टाळ्या पिटत म्हणाली.

" आजोबा, तुम्ही पण चला ना. छानपैकी पिकनिक होईल. किनाऱ्यावर." जेमिमाने घरातून आलेल्या आजोबांना विनवले.

" अरे, तुमचा बाप वेडा आहे झालं. ही गाडी कसली हलतेय जागची !" आजोबा हेटाळणीने म्हणाले.

" उत्तरादाखल प्रो. नी स्टार्टरवर पाय दाबला. इंजिनाने निषेधात्मक गर्जना केली.

" नाहीच मुळी ! जाणारच गाडी. पहा तरी." जेमिमा फुरगटून म्हणाली.

" आणि समजा झालीच चालू तर ती थांबायचीच नाही कधी." आजोबांनी आशीर्वाद दिला. असल्या बेभरवंशाच्या वाहनात मुलांना घेऊन जायची कल्पना त्यांना मुळीच पसंत नव्हती आणि शिवाय -

" मला ताबडतोब अलास्काला जायला हवं. युकॉन येथे सोनं सापडलं आहे म्हणे." आजोबा म्हणाले आणि त्यांनी घराच्या बाहेरच्या– आपल्याकडच्या पोलिसांच्या निवाऱ्याप्रमाणे दिसणाऱ्या– लाकडी संडासाकडे मोर्चा वळवला. त्यांचा हा नेहमीचा संकेत ठरलेला होता.

प्रो.नी गाडी चालू केली. एक्झॉस्ट जोराने शिकले. गाडीने जंगली माणसासारखी पुढे उडी मारली; आणि मग ती एकदम

थांबली आणि जागच्या जागी वरखाली होत घुमू लागली. तिने डुरकण्या फोडायला आणि गाडीत बसलेल्यांची हाडे खिळखिळी करायला आरंभ केला; आणि दुसऱ्याच क्षणी ती एखाद्या पटाईत चित्त्यासारखी धावू लागली. गाडी मुख्य रस्त्याला लागली. गाडी करत असलेले आवाज भिंतीवर आणि कुंपणावर आदळून प्रतिध्वनी उमटू लागले. इंजिन काही वेळ हळूहळू आवाजात स्वतःशी कुजबुजल्यासारखे बोले. तर दुसऱ्याच क्षणी ते मोठ्याने तोऱ्यात कर्कश आवाज करी. अधूनमधून नाक शिकरल्यासारखी त्याची खारखूर सुरू होई.

" चिट्टी, चिट्टी चिट्टी चिट्टी. " इंजिन बोले.

" बँग ऽऽ बँग." बॉनेटमधल्या कशाचा तरी आवाज येई. प्रो.नी ॲक्सिलरेटरवर पायाने हाच ठेका धरला.

" चिट्टी, चिट्टी–बँग–बँग. "

परंतु त्याचा परिणाम भलताच झाला. गाडी पुढे सरके. मग एकदम हळू चाले आणि नंतर पुनः झपाट्याने पळे. ते भरवेगात एका वळणावरून वळले.

" संभाळा बाबा. " जेमिमा किंचाळली.

समोरून एक मोटार येत होती. रस्त्याच्या एका बाजूला कुंपण होते आणि दुसऱ्या बाजूला डबके. दोन्ही गाड्या वळल्या. प्रो.ची गाडी कुंपणाला घासली आणि दुसरी मात्र सरळ डबक्यात गेली. प्रो.नी गाडी थांबवून वळून पाहिले.

आणि कपाळावर हात मारून घेतला.

तो–अथवा ती दुसऱ्या गाडीची ड्रायव्हर ट्रुली स्क्रंप्शस होती, या बाईला मोटारीत बसून डबक्यात उडी मारायचे वेड तर नाही ना असा गंभीर विचार प्रो. च्या मनात चमकून गेला.

एकदा काय म्हणे तर मुले अचानक मोटारीपुढे आली. आता म्हणेल तुमची गाडी आली वाटेत !

काही का असेना, स्त्री-दाक्षिण्य म्हणून का होईना ट्रुलीला हात देऊन बाहेर काढणे जरूर होते.

ट्रुलीला बाहेर काढले तेव्हा ती घुश्यातच होती; पण जेरेमी आणि जेमिमा यांच्यासमोर तिचा घुस्सा टिकलाच नाही.

"अय्या, ट्रुलीमावशी तू ?" जेमिमा आनंदाने टाळ्या पिटत म्हणाली, "आम्ही कुठं चाललोय् माहिताय् का ?"

"कुठं ?" ट्रुलीने मृदूपणाने विचारले.

"अग, समुद्रकिनाऱ्यावर पिकनिकला. ए, तूही चल ना गडे. अशी मज्जा येईल. होय की नाही रे जेरेमी ?" ती ट्रुलीच्या हाताला लोंबकळत म्हणाली.

"मजाच मजा!" जेरेमीही ट्रुलीच्या दुसऱ्या हाताला लटकत म्हणाला.

आणि ट्रुलीला काहीही बोलू न देता त्यांनी तिला चिट्टी-चिट्टी बँग-बँग मध्ये आणून कोंबलेच.

ती दिव्य गाडी पाहून ट्रुलीचे डोळे विस्फारले.

"अग ऽऽ बाई, ही कसली गाडी म्हणायची !" तिने विचारले

"आमच्या बाबांनी बनवली आहे ती." जेमिमा कौतुकाने ओसंडलेल्या आवाजात म्हणाली.


"आणि मावशी, ती पळते कशी ते बघ तरी !" जेरेमीने आपला सूर मिळवला.

"आणि हिचं नाव काय आहे ठाऊकाय का–चिट्टी-चिट्टी बँग-बँग." जेमिमाने माहिती पुरवली.

“ हे कसलं विचित्र नाव बाई ?” ट्रुलीची शंका.

“ अग, गाडी चालताना हेच गाणं म्हणते. ऐकशीलच तू आता.” जेरेमीकृत निरसन.

आणि खरोखरच गाडी निघाल्यावर तिने आपला ठेका धरला.




त्या तालावरच ते समुद्रावर येऊन पोहोचले.

मोकळ्या हवेत आणि स्वच्छ उन्हात साऱ्यांच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. प्रोफेसरांनाही काय करू आणि काय न करू असे झाले. ते आपला नेहमीचा गंभीरपणा विसरून मुलांबरोबर

वाळूत आणि पाण्यात बागडण्यात सामील झाले. ट्रुलीला तर मुलांनी केव्हाच आपल्यात सामील करून घेतले होते.

थोड्या वेळाने ट्रुलीला मुलांसह सोडून प्रो. मोटारीकडे आले आणि त्यांनी सर्व काही ठाकठीक आहे, ती जाताना सुरळितपणे जाईल याची खात्री करून घेतली. थोड्याच वेळात ट्रुलीही तेथे येऊन त्यांच्याशी गप्पा मारू लागली.

हळूहळू उन्हे वर चढली. वारा पडला. मंद लाटांचा आवाज हलक्या आवाजातल्या कुजबुजीसारखा ऐकू येऊ लागला. किनाऱ्यावर बागडणाऱ्या मुलांची किलबिल ऐकू येत होती. सारे कसे शांत, शांत होते. सकाळपासूनच्या श्रमाचा गोड शिणवठा अंगभर पसरत चालला होता.

उन्हाची तिरीप तोंडावर आल्याने प्रो. नी डोळे मिटून घेतले. त्यांची तंद्री जेमिमाच्या तक्रारीने भंगली.

"बाबा, आता समुद्रावर चाचे लोक नसतात ना हो?"

"असतात का नाही हो बाबा ? आणि ते आपली लूट अशीच किनाऱ्यावर आणून पुरून ठेवतात नाही का ?" जेरेमी मासिकाची सुरळी करून तिचा दुर्बिणीसारखा उपयोग करत ऐटीत समुद्राकडे पाहात म्हणाला, "आणि म्हणून समुद्रावर सारखी नजर ठेवायला पाहिजे नाही का ?"

प्रो. ना काय बोलावे हे सुचेना. चाचे आहेत म्हणावे तर छोटी जेमिमा घाबरली असती आणि शिवाय ते खोटे बोलणे झाले असते. बरे, नाहीत म्हणावे तर जेरेमीचे भावविश्व उध्वस्त झाले असते.

"बाबा, ती पाहिलीत का बोट?" जेरेमीच्या आरोळीने त्यांची या पेचातून सुटका केली.

अरेच्या! हे जहाज मध्येच कुठून उगटले हे प्रो. ना समजेना. आता काही क्षणापूर्वी तर तेथे काही नव्हते.

पण जहाजच आहे का हे साधेसुधे? की किनाऱ्यावर निर्धास्त-पणे वावरणाऱ्यावर अचानक धाड घालणारे कुणी–

प्रो. दचकले. त्यांनी डोळ्यांवर हात धरून न्याहाळून क्षितिजा-कडे पाहिले.

ती एक साधी, जुनाट टग-बोट होती!

पण उघडपणे ते म्हणाले,

"ते साधेसुधे जहाज समजू नका. ती त्या बदमाष बॅरन बॉम्बर्स्टची बोट आहे."

आणि काय आश्चर्य! समोर तीच बोट आहे असे त्यांना दिसून आले. हे कसे झाले त्यांना कळेना. त्यांनी डोळे फाड-फाडून पाहिले.

शंकाच नको. तीच बोट ती. तिच्यावर फडकणारे जांभळे निशाण आता दिसू लागले.

"तुम्हाला आहे ठाऊक हा राजा बॉम्बर्स्ट कोण आहे ते?" प्रो. घोगऱ्या आवाजात म्हणाले, "व्हल्गेरियाचा राजा. जगात याच्याइतका दुष्ट मनुष्य कुणीच नसेल."

जेरेमी आणि जेमिमा एका आवाजात 'बापरे' करून किंचाळले.

"आणि सात समुद्र पार करून तो इथं कशाला आला आहे माहीत आहे का?" प्रो. सांगू लागले. आता त्यांना मजा येऊ

लागली. सत्य आणि कल्पना यांच्या सीमा सरमिसळ होऊ लागल्या. "तो इथं आला आहे तो आपली चिट्टी-चिट्टी-बँग-बँग चोरून न्यायला. प्रो. कॅरेक्टस पॉटस् नावाच्या महान संशोधकाने शोधून काढलेल्या या अफलातून गाडीची कीर्ती त्याच्या कानापर्यंत गेली आहे."

आता बोटीवर दुर्बिणीच्या नळकांड्यांतून किनाऱ्याचे निरीक्षण करणारा राजाचा खलनायकी चेहरा स्पष्ट दिसू लागला. "बापरे, काय भयंकर दिसतोय तो बाबा." जेरेमी किंचाळला.

"आपल्या चिट्टी-चिट्टीला पळवून नेईल तो. बघा. बोट जवळ यायला लागलीय. पळा बाबा." जेमिमा त्यांच्या हाताला ओढत म्हणाली, "ते यायच्या आत आपण लांब जाऊ या."

प्रो.चे लक्ष जवळ जवळ आणखी जवळ येणाऱ्या बोटीकडे खिळले होते. इतक्यात बोटीवरची तोफ वळवून किनाऱ्याकडे रोखली गेल्याचे त्यांना स्पष्ट दिसले.

आता इतक्या थरावर गोष्ट आली असताना ती मधूनच सोडून निघून जाणे त्यांच्या जिवावर आले. ते गंभीरपणे मुलांकडे वळून म्हणाले,

"अरे पण आपण जाणार कसे इथून ? पाहिलंत का आपण गप्पात रंगलो असताना भरती सुरू झाल्याचं आपल्या लक्षातच आलं नाही. आणि आता साऱ्या बाजूंनी पाण्यानं वेढलंय आपल्याला" सर्वांनी चमकून आजूबाजूला पाहिलं. खरंच चहूबाजूला त्यांना पाण्याने वेढले होते.

कशी गंमत केली साऱ्यांची म्हणून प्रो.ना मजा वाटली; पण जेव्हा त्यांनीही आजूबाजूला पाहिले तेव्हा ते चाट पडले. खरंच ते भरतीच्या वेढ्यात सापडलेले होते.

" अग बाई ! आता कसं करायचं हो." ट्रुलीच्या भयाकुल आवाजाने ते भानावर आले. जेरेमी आणि जेमिमा यांच्या तोंडातून भीतीमुळे शब्दच फुटत नव्हता; पण त्यांच्या घबराटीमुळे प्रो.ना स्फुरण चढले.

" घाबरायचं काही कारण नाही." ते शांतपणे म्हणाले, "चला साऱ्यांनी गाडीत बसा."

" अहो, पण–" ट्रुली अविश्वासाच्या स्वरात म्हणाली; पण दुसऱ्याच क्षणी त्यांच्या मुद्रेवरील आत्मविश्वासाचा भाव पाहून ती मुकाट्याने मोटारीत जाऊन बसली.

प्रो.नी हॅण्डल बाहेर काढले आणि घोट्याएवढ्या पाण्यात उभे राहून ते फिरवले.

एकदा–दोनदा–तीनदा. पण–

रामा–शिवा–गोविंदा.

इंजिन सुरू होईल तर शपथ !

ट्रुलीने तीन-तीनदा थ्रॉटल दाबले पण इंजिनात जान येईना.

" चला, खाली उतरा. आपल्याला आता पोहूनच किनाऱ्यावर जायला हवं." प्रो. थकल्या आवाजात म्हणाले.

" पण ते कसं शक्य आहे ? " ट्रुली म्हणाली, " पाणी खोल आहे. आणि प्रवाहाला ओढही जबरदस्त असणार."

" आणि बाबा, आपल्या चिट्टी-चिट्टीला इथंच सोडून जायचं ?" सारेजण हतबुद्ध होऊन राहिले.

त्यांची केविलवाणी अवस्था पाहून राजा बॉम्बर्स्टना आसुरी आनंद झालेला दिसत होता. तो जिभल्या चाटत होता. त्याची ती भयानक बोट जवळ, जवळ येत होती.

जवळ ! आणखी जवळ !

" धाड्ऽऽधुडुम् ऽऽ धाड ऽऽऽ" आवाज झाला.

प्रो.नी डोळे घट्ट मिटून घेतले.

बोटीवरच्या तोफेतला गोळा असणार हा ! त्या राक्षसी बॅरनने सरबत्ती सुरू केलेली दिसतेय !

अरे देवा !

पण बराच वेळ झाला तरी काही होईना तेव्हा त्यांनी डोळे उघडून पाहिले.

आवाज चिट्टी-चिट्टीच्या इंजिनातून येत होता. गाडी धडधडत होती.

" बाबा, चला बसा लवकर." जेमिमा किंचाळली.

प्रो.नी आत बसून स्टीअरिंग व्हील हातात घेतले खरे पण त्यात जीव नव्हता. गाडी सुरू झाली तरी इंजिनात लवकरच पाणी शिरणार. मोटारीतही शिरणार आणि आपल्या साऱ्यांना जलसमाधी मिळणार हे नक्की दिसू लागले.

त्यांनी तिरीमिरीने ब्रेक काढले.

गाडी चालू झाली.

आणि काय आश्चर्य !

बॉनेट पाण्याखाली जायच्या ऐवजी बोटीच्या नाकासारखे वर उचलले गेले. पाण्याखालच्या चासीमधूनही काहीतरी निराळाच आवाज येऊ लागला आणि चाके खाली गरगर फिरण्याच्या ऐवजी चक्क बाजूला येऊन वल्हचासारखी पाणी कापू लागली.

" अशक्य !"

प्रो.ना वाटले आपल्या ओरडण्याने साऱ्यांच्या कानठळ्या बसलेल्या असणार म्हणून त्यांनी अपराधीपणे आजूबाजूला पाहिले. पण आपल्या तोंडून शब्दच फुटला नव्हता असे त्यांना आढळून आले.

हे असे झाले कसे ते त्यांना समजेना. त्यांनी चिट्टी-चिट्टीचा जीर्णोद्धार करताना तिच्या मूळ रचनेत काही फरक केला होता खरा; पण त्यापैकी कशानेही हे असे होण्यासारखे नव्हते हे त्यांना खूप ठाऊक होते.

"खरंच कमाल केलीत बाई, तुम्ही !" ट्रुली कौतुक ओसंडणाऱ्या आवाजात म्हणाली, "कित्ती, कित्ती हुशार आहात तुम्ही !"

प्रो. काहीतरी बोलणार होते पण झाकली मूठ सव्वा लाखाचीच राहू द्यावी म्हणून ते गप्प बसले.

पण हे असे झाले कसे ?

त्याच वेळी हे सारे स्वप्न तर नसावे ना असा एक विचार त्यांच्या मनाला चाटून गेला. त्या विचाराने निराशा होण्याऐवजी त्यांना उलटे बळ आले. हे स्वप्न असेल तर मग भिण्याचे काहीच कारण नव्हते.

एखाद्या जातिवंत खलाशाच्या बेफिकिरीने त्यांनी चाक फिरवले आणि चिट्टी-चिट्टीचा मोर्चा सरळ राजाच्या जहाजाकडेच वळवला.

जहाजाच्या डेकवरचे लोक पाण्यात पडेपर्यंत वाक-वाकून पाहात आहेत आणि डोळे फाटेपर्यंत वासले आहेत हे त्यांना दिसून आले. खुद्द राजा डेकवर दणादण उड्या मारून काहीतरी हुकूम सोडत आहे असे दिसले.

तो बहुतेक तोफांची सरबत्ती करण्याचा हुकूम देत असावा हे प्रो. नी ताडले. एवढ्यात खरंच एक गोळा त्यांच्याजवळ येऊन पाण्यात पडला. उसळलेल्या पाण्याने साऱ्यांना सचैल स्नान घडले.

जेरेमी, जेमिमा आणि ट्रुली साऱ्यांनाच आता या प्रकारात रस येऊ लागला होता. त्यांच्या ठिकाणी भीतीचा लवलेश नव्हता. सारेजण उत्साहाने प्रो. ना उत्तेजन देऊ लागले. प्रो. ना जास्तच स्फुरण चढले. त्यांनी चिट्टी–चिट्टीचा रोख जहाजाच्या पुढच्या बाजूकडे वळवला.

जहाजावर आता चांगलाच कोलाहल माजला आहे हे त्याच्या-वरून ऐकू येणाऱ्या गोंधळावरून स्पष्ट होत होते. बोटीचा बंब बकाबका धूर ओकू लागला होता. बोटीवरही सर्वत्र धूरच धूर झाल्याचे दिसत होते.

पुन्हा एकदा बोटीवरून 'धुडुम्ऽ' आवाज करून तोफगोळा सुटला; पण एव्हाना चिट्टी–चिट्टी बोटीच्या अगदी अंगचटीला आली असल्याने तो गोळा पलीकडे जाऊन पाण्यात फक्त पडला.

बोटीच्या जवळ जवळ जात आता तिच्यावर धडक बसणार एवढ्यात प्रो. नी कुशल नावाड्यासारखी चिट्टी–चिट्टी बाजूला वळवली आणि बोटीला वळसा घालून त्यांनी गाडी–माफ करा, बोट, कारण आता चिट्टी–चिट्टी बोटीचे काम करीत होती. किनाऱ्याकडे वळवली.

झाले एवढे खिजवणे पुरे झाले होते.

थोड्या वेळाने त्यांनी मागे वळून पाहिले.

राजाच्या बोटीने भरवेगाने त्यांचा पाठलाग सुरू केला होता. प्रो. नी चिट्टी–चिट्टीचा वेग वाढवला.

थोड्याच वेळात तिची चाके जमिनीला टेकली आणि जणू आपण त्या गावचेच नाहीत अशी ती चालू लागली. आपल्यामागे घासण्याचा प्रचंड आवाज झाला म्हणून प्रो. नी मागे वळून पाहिले.

त्यांचा पाठलाग करण्याच्या भरात भान न राहिल्याने राजाची बोट सरळ पुढे येत-येत वाळूत येऊन रुतली होती आणि ध्यानी-मनी नसताना बसलेल्या त्या धक्क्यामुळे राजाची स्वारी डेकवर चांगलीच तोंडघशी पडली होती.

खवचटपणे बोटीला 'टाऽऽटा' करत प्रो. नी गाडी जोरात हाकारली.

✦ ✦ ✦

पण एवढ्याने नाउमेद झाला तर तो कसला राजा बॉम्बर्स्ट ! काहीही करून ही गुणी मोटार काबीज करायची हा त्याचा निश्चय अधिकच दृढ झाला. आता सरळ मार्गाने काम भागत नाही तर वाकड्या मार्गाने जायला त्याची हरकत नव्हती. त्याने आपल्या दोन निवडक हेरांना बोलावले आणि ही कामगिरी त्यांच्यावर सोपवली.

हे दोन्हीही हेर मोठे हुषार होते. वेषांतर करून कुठल्याही लोकांत मिसळून जाण्यात त्यांचा हात धरणारा कुणी नव्हता. दोघेही इंग्लंडच्या किनाऱ्यावर गुपचूप उतरले. त्यांनी प्रो. पॉटस्‌चे घर शोधून काढले आणि त्याच्यावर कुणालाही संशय येऊ न देता टेहे[illegible]णी करून त्याचा चिट्टी-चिट्टीतून नेहमी जाण्या-येण्याचा मार्ग बरोबर हेरून ठेवला आणि पुढची योजना आखली.

चिट्टी–चिट्टीच्या मार्गावरचे एक उंच झाड त्यांनी मुळातून कापले; पण ते बेटे झाड रस्त्यावर आडवे पडायच्या ऐवजी मागे जंगलातच पडले. दोघेही खूप चडफडले. या दगाबाज इंग्रजी जमिनीला त्यांनी शिव्यांची लाखोली वाहिली; पण त्याने काम थोडेच होणार ? मग त्यांनी रस्त्यावर सुरुंग लावून चिट्टी–चिट्टीला फारसा धोका पोचणार नाही पण तिच्यात बसणाऱ्या साऱ्यांना चांगला दणका बसेल अशा बेताने स्फोट घडवून आणायचे ठरवले. सारी काही व्यवस्था चोख झाली. पण ऐन वेळी माशी शिंकली. सुरुंगाऐवजी बत्तीचाच स्फोट झाला आणि त्या दुक्कलीला आपल्या भाजल्याच्या जखमांवर मलमपट्टी करत बसावे लागले. आता मात्र त्यांचे धाबे दणाणले. राजाच्या हुकमाची तामिली झाली नसती तर त्याने त्यांचे कानच कापून त्यांच्या हातावर ठेवले असते. त्यांनी मग अत्यंत काळजीपूर्वक एक नवी योजना आखली. ती पुन्हा पुन्हा तपासून पाहिली. तिच्यात काही उणिवा नाहीत याची त्यांनी खात्री करून घेतली आणि मग त्यांनी डाव टाकला.

बाहेरून छोटचा पुलासारखा दिसेल असा एक कृत्रिम बोगदा त्यांनी रस्त्यावर उभा केला. त्या बोगद्यात पुढे एक घोडचांची गाडी तयार ठेवली आणि बोगद्यात मोटार शिरली की सरळ गाडीत जाईल असा उतार केला. प्रो.प्रॉटस् आपल्या नादात असणार. गाडी आली की सरळ घोडागाडीत शिरणार. ती शिरली रे शिरली की घोडागाडीचे मागचे दार मिटेल. मग चिट्टी-चिट्टी जातेय् कुठं !

ती जाणार ती थेट घोडागाडीत बसून राजेसाहेबांकडेच !

अगदी तस्से झाले. दृष्ट लागेल इतक्या चपखलपणाने ! आणि गाडीचे घोडे आपली लूट घेऊन चौखूर निघाले. दोघाही हेरांना

आपल्याला राजेसाहेब या कामगिरीबद्दल आपला काय बहुमान करतील याची स्वप्ने वाटेवरच पडू लागली.

पण मुक्कामावर आल्यावर घोडागाडीचे दार उघडले आणि आतून जी गाडी बाहेर पडली ते पाहून त्यांच्या तोंडचे पाणीच पळाले.

ती चिट्टी-चिट्टी बँग-बँग नव्हती. तर लॉर्ड स्क्रॅप्शससाहेबांची रोलस राईस होती. आणि सकाळीच फिरायला निघाले असताना त्यात आलेल्या या व्यत्ययाने लॉर्डसाहेबांनी सारी गाडी डोक्या-वर घेतली.

आपले कुठे चुकले हेच त्या हेरांना समजेना.

प्रो. पॉटस् रस्त्याने येताना वाटेतच कुठेतरी वळून दुसऱ्या गल्लीने जाईल ही शक्यता हिशेबात घ्यायचेच ते विसरले होते.

आणि नेमके तेच झाले होते.

पण यामुळे ते दोघेही गांगरून गेले नाहीत. त्यांनी आलेल्या संधीचा उपयोग करून घेण्याचे ठरवले. लॉर्डसाहेबांच्या आरडा-ओरडीला न जुमानता त्यांनी त्यांच्या व त्यांच्या ड्रायव्हरच्या अंगावरचे कपडे काढून आपल्या अंगावर चढवले. त्या पोशाखात दोघेही हुबेहूब इंग्लिश माणसासारखे दिसत होते.

नंतर लॉर्डसाहेबांना आणि त्यांच्या ड्रायव्हरला त्यांनी नीट दोन झाडांना बांधून घातले आणि त्यांनी आपला मोर्चा सरळ प्रो. पॅाटस्च्या घराकडे वळवला.

ते घरापाशी पोचले तेव्हा आजोबा घाईघाईने बाहेर पडत होते. त्यांचे कपडे त्यांच्या वल्लीपणाला शोभतील असेच विचित्र होते.

संशोधक प्रोफेसर हे मोठे वल्ली असतात, हे दोघांनाही ठाऊक होते. त्यांनी विचार केला की, प्रो.पॅाटस् ते हेच असावेत.

" प्रो.पॅाटस् ते आपण–आपणच का ?" खात्री करून घेण्यासाठी एकाने विचारले.

आजोबांना वाटले हे कुणीतरी फिरते विक्रेते आपल्या गळचात काहीतरी माल मारण्यासाठी आले असावेत आणि शिवाय आजोबा घाईत होते.

" वरं मग ? " त्यांनी तिरीमिरीतच विचारले.

" आपली सुंदर मोटार कुठं आहे ?" दुसऱ्या हेराने हरखून प्रश्न केला.

" मोटार? ती तर मी केव्हाच देऊन टाकली." आजोबा उत्तरले.

मोटार ?

देऊन टाकली ?

आश्चर्यातिशयामुळे दोन्हीही हेरांचे डोळे त्यांच्या खोबणीतून बाहेर पडतील असे वाटू लागले.

त्यांना तसेच पाहते सोडून आजोबा घाईघाईने आपल्या आवडत्या लाकडी संडासाकडे निघाले.

" माफ करा. पण मला आताच्या आता आफ्रिकेला जायला हवं." ते नेहमीच्या मिस्किलपणे म्हणाले आणि त्यांनी आत जाऊन दार लावून घेतले.

आफ्रिका ?

दोन्हीही हेरांच्या डोक्यांत एकदम लख्खकन वीज चमकली. ही या विचित्र वल्लीची परवलीची भाषा असावी हे त्यांनी

ओळखले. हे लाकडी खोके म्हणजे त्यांच्या गुप्त प्रयोगशाळेचे दार असणार आणि तेथेच हे संशोधक महाशय गेलेले असणार हे उघड होते. दोघांनीही एकदम चुटक्या वाजवल्या.


त्यांनी ताबडतोब जवळ लपवून आणलेल्या बिनतारी तारायंत्रातून राजेसाहेबांना संदेश पाठवला आणि परिस्थितीची कल्पना देऊन ताबडतोब विमान पाठवण्याची मागणी केली. विमान येईपर्यंत ते दोघेही तिथेच झुडपाआड दडून बसले. विमान थोडचा वेळातच आले; पण दोघांनाही त्याने फार वेळ लावल्यासारखे वाटले; आणि म्हणून ते राजावर चरफडत होते. न जाणो प्रो. पॉटस् मधूनच बाहेर पडून दुसरीकडे कुठे गेला तर खुद्द संशोधक अख्ख्या प्रयोगशाळेसह पळवण्याची आलेली नामी संधी गमावली असती.

ते बलून विमान होते. त्याच्या खाली पाळण्यात खुद्द राजेसाहेब हे कौतुक पाहायला आले होते; त्यामुळे दोघाही हेरांची छाती अभिमानाने फुगली. पाळण्यातून सोडलेल्या दोराच्या आकडचाला त्यांनी लाकडी खोक्याची कडी अडकवली आणि मग पाठोपाठच ते माकडासारखे दोरावरून चढत पाळण्यात जाऊन बसले.

विमान सुरू झाले. त्यामुळे हिसक्यासरशी लाकूड-घर हवेत उचलले गेले.

आत बसलेल्या आजोबांना हे काय झाले याची काहीच कल्पना येईना. त्यांनी काय प्रकार आहे हे पाहण्याकरता घाईघाईने दार उघडले. पाहतात तर आपले लाकूड-घर हवेत तरंगत निघाले आहे.

"धावा, धावा. मला वाचवा." आजोबा घाबरून ओरडले. पण त्यांच्या हाका हवेवर विरून गेल्या.



हा सारा प्रकार झाला त्या वेळी प्रो. पॉटस्, ट्रुली, जेरेमी आणि जेमिमा यांच्यासह चिट्टी-चिट्टीतून रपेटीला बाहेर गेले होते. ते परत येत असताना साऱ्यांना आभाळात तरंगत निघालेले आजोबा आणि त्यांचे लाकूड-घर दिसले.

हा सारा प्रकार इतका भयानक नसता तर आजोबांची ती विचित्र अवस्था पाहून प्रो. पॉटस्ना हसू लोटले असते; पण ही वेळ तशी नव्हती.

त्यांनी तावडतोब विमानाचा पाठलाग सुरू केला.

पण विमानाला संचारासाठी निर्वेध आकाश होते, तर प्रो. ना जमिनीवर निरनिराळ्या अडथळ्यांतून जावे लागत होते. तरीही त्यांनी कुंपण म्हटले नाही, आडवी आलेली जनावरे म्हटली नाहीत

की काही नाही. त्यांची दृष्टी विमानावर खिळलेली होती. ते दृष्टीआड होऊ देता कामा नव्हते.

साऱ्यांचीच ही अवस्था झाली होती; आणि त्यामुळे कडचावरून गाडी लोटली तरी त्याचा पत्ता त्यांना लागला नाही. लागला तेव्हा प्रो. नी गाडी आवरायचा आणि ब्रेक दाबायचा पुष्कळ प्रयत्न केला; पण तेव्हा फार उशीर झाला होता.

चिट्टी-चिट्टी वेगाने खाली पसरलेल्या अथांग सागराकडे झपाट्याने निघाली होती.

सर्वांनी भीतीने डोळे मिटून घेतले.

✦ ✦ ✦

आजोबांनी डोळे उघडले तेव्हा आपण आपल्या लाकूड-घरातच बसल्या-बसल्या भिंतीला डोके टेकून झोपलो आहोत असे त्यांना आढळून आले. क्षणभर हे असे झाले कसे ते त्यांना आठवेना. त्यांनी शरमून बाहेर जाण्यासाठी दार उघडले.

त्याच क्षणी त्यांना सारे आठवले.

अजूनही लाकूड-घर हलतच होते. त्या अर्थी आपला हवाई प्रवास चालूच आहे हे त्यांनी ओळखले.

एवढ्यात आपण झपाट्याने खाली उतरत असल्याचे त्यांना जाणवले; आणि त्यांच्या काळजात धस्स झाले. काही वेळापूर्वी समुद्रावरून जाताना विमानात काही बिघाड झाल्यामुळे आपण असेच खाली-खाली जाऊन समुद्रास्तृप्यंतु होण्याची पाळी आली होती हे त्यांना आठवले. लाकूड-घरात समुद्राचे पाणी शिरायला लागले होते. विमानाला लाकूड-घराचे ओझे जास्त झाले असावे. ते हलके करण्यासाठी पाळण्यातून त्याच्यातल्या एकेक वस्तू समुद्रात

टाकलेल्या त्यांना खिडकीतून दिसल्या. शेवटी त्या दोन्ही हेरांना – अर्थात ते हेर आहेत हे आजोबांना ठाऊक नव्हते – पाण्यात फेकून देण्यात आले.

त्यामुळे आता पुन्हा तशीच पाळी आली की काय असे त्यांना वाटले; पण या वेळी विमानाच्या खाली उतरण्याला एक पद्धत आहे; ते पहिल्यासारखे अनियमित नाही हे त्यांना लवकरच जाणवले आणि त्यांचा जीव भांड्यात पडला. थोड्याच वेळात आपण जमिनीला टेकल्याचे त्यांना स्पष्टपणे जाणवले. आता या वाऱ्यावरच्या वरातीनंतर पुढे काय वाढून ठेवले आहे या भीतीने ते ग्रासले. त्यांनी भीत भीत दरवाजा किलकिला करून बाहेर पाहिले.

आणि त्यांचा डोळ्यांवर विश्वासच बसेना.

बाहेर लाल रुजामा अंथरलेला होता आणि त्यांच्या स्वागता-साठी कुणीतरी चित्र-विचित्र पोषाख केलेला सेनाधिकारी उभा होता.

" व्हलगेरियात आपले स्वागत असो. " तो अदबीने म्हणाला.

आजोबांना हे काय होते आहे ते कळेना; पण जे होत होते ते सारे सुखावह होते. पुढे काय व्हायचे असेल ते पुढे पाहता येईल. दारी चालत आलेल्या मान-सन्मानाचा फायदा का घ्याना असा विचार करून आजोबा दार पूर्ण उघडून मोठ्या रुबाबात बाहेर पडले. बाहेर पडल्यावर लष्कराने त्यांना मानवंदना दिली. तिचा त्यांनी झोकात स्वीकार केला. जणू काही त्यांना असे मानसन्मान स्वीकारण्याची नेहमीचीच सवय असावी.

आपण एका पर्वतशिखरावर बांधलेल्या किल्ल्याच्या आवारात आहोत असे आजोबांना दिसून आले. किल्ला बांधला होता मात्र

मोठा छान. त्याचे बुरूज बुलंद दिसत होते. किल्ल्याला पांढरा-शुभ्र रंग दिलेला होता. पण का कोण जाणे त्यामुळे प्रसन्न वाटण्या-ऐवजी त्या साऱ्या वास्तूवर एक प्रकारची अवकळाच पसरली आहे असे वाटत होते. आजोबांनी हा उदास विचार मनातून झटकून टाकला आणि ते सेनाधिकाऱ्याबरोबर निघाले. एक एक प्रचंड दालन ओलांडत ते चालले होते. दर वेळी त्यांच्या पुढचे दार करकर आवाज करत उघडे आणि ते पार झाले की त्यांच्या मागे ते करकर आवाज करत मिटू लागे. आजोबा या साऱ्या कंटाळवाण्या प्रकाराने वैतागले; आणि हे सारे केव्हा संपते आहे असे त्यांना झाले.

शेवटी एकदाची ही पदयात्रा संपली.

ते आले तो हॉल सर्वांत मोठा आणि विशेष थाटाने सज-वलेला होता. त्यात सिंहासनावर एक मुगुटधारी बसला होता. आजोबा तेथे पोहोचताच तो घाईघाईने पायऱ्या उतरून खाली आला आणि त्याने त्यांच्याशी हस्तांदोलन केले.

" महान संशोधक प्रो. पॉटस् यांचे स्वागत असो माझ्या या व्हल्गेरिया राज्यात." तो मुगुटधारी म्हणाला, "माझं नाव राजा बॉम्बर्स्ट."

आजोबांना तो मुगुटधारी काय म्हणतो हे कळेना. कळले तेव्हा त्यांना त्याचा जरा रागच आला. आपल्या अव्यवहारी, स्वप्नाळू मुलाशी तो आपली गल्लत करतो आहे हे त्यांना आवडले नाही. ते तिरीमिरीतच म्हणाले,

" कुणी सांगितलं तुम्हाला ? "

" म्हणजे तुम्ही प्रो. पॉटस नव्हे ? " राजा सुरीसारख्या थंड आवाजात म्हणाला, " चला जल्लादाला बोलवा. " त्याने हुकूम सोडला.

" जल्लाद, जल्लाद. जल्लादाला बोलवा. "

राजेसाहेबांचा हुकूम राजवाड्याच्या दालना-दालनामधून घुमत चालू लागला.

" जल्लाद ! केवळ आपण प्रो. पॉटस् नाही म्हणून हा आपल्याला फासावर लटकावणार ? " आजोबांच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला. राजा वेडा आहे हे उघड दिसत होते; पण आता त्याच्या तावडीत सापडल्याने सुसरीबाई, तुझी पाठ मऊ म्हणून वागणे भाग होते हे त्यांनी ओळखले. ओशाळे हसत ते म्हणाले,

" मी महान संशोधक आहे असं कुणी सांगितलं तुम्हाला ? "

" अस्सं होय. " राजेसाहेब सुटल्यासारख्या आवाजात म्हणाले, " पण हा तुमचा विनय आहे प्रोफेसरसाहेब. अरे माझा घोडा आणा पाहू. "

पुन्हा दालना-दालनातून " घोडा, घोडा, राजेसाहेबांचा घोडा " असा आवाज निनादू लागला.

थोड्याच वेळात घोड्याच्या टापांचा आवाज ऐकू येऊ लागला आणि लवकरच एक घोडा ऐटीत आत आला.

तो चक्क लाकडी घोडा होता.

आजोबा पुन्हा बुचकळ्यात पडले.

' आपण स्वप्नात तर नाही ना ' अशी एक दाट शंका त्यांच्या मनाला चाटून गेली; पण आपल्या स्वप्नाची धाव कुठपर्यंत होती

हे त्यांना चांगले ठाऊक होते. आफ्रिकेचे घनघोर अरण्य किंवा फार तर हिंदुस्थानची अद्‌भुत भूमी या पलीकडे फारशी आपली मजल नाही. पण ही तर सारी यक्षभूमीच होती.

शंकाच नको, नाहीतर बशीएवढे मोठे–मोठे डोळे असणारी ती बाई स्वप्नात तरी कशी असणार ?

" या आमच्या राणीसरकार. " राजेसाहेबांनी ओळख करून दिली. आणि आजोबा तिच्याशी हस्तांदोलन करण्याला पुढे सरसावले तसे राजेसाहेब खेकसले " झुकून कुर्निसात करा. "

आजोबांनी वरमून लवून सलाम केला. आपण त्यांच्या राज्यात आहोत हे विसरून चालणार नाही असे त्यांनी स्वत:ला बजावले. त्यांच्या लवण्याने खुश होऊन राजेसाहेब म्हणाले,

" आणि हे महान संशोधक प्रो. पॉटस्, बरं का, राणीसरकार. आम्ही तुम्हाला लवकरच एक जमाडी-जम्मत देणार आहोत बरं का, राणीसाहेब ! होय की नाही हो, प्रोफेसर ? "

आजोबांनी मान झुकवून 'हो' स 'हो' केले आणि काहीतरी बोलायला हवे म्हणून ते म्हणाले,

" बाकी राणीसाहेब, माणसं मोठी झाली तरी मुलासारखीच भाबडी असतात नाही का ? "

आजोबांचे शब्द घशातच अडकले. आपले बोलण्यात काय चुकले हेच त्यांना कळेना. काहीतरी चुकले होते हे खास. कारण आजोबांनी लवून सलाम केला, " बॅरनसाहेबांनी " त्यांची तरफदारी केली त्यामुळे राणीसाहेबांच्या बशी-बशीएवढ्या डोळ्यांत येत चाललेली कौतुकाची चमक लुप्त होऊन संतापाची झलक आली.

" मुलं ? " राणी किंचाळली, " ते नतद्रष्ट नाव या राजवाड्यात घ्यायचं नाही असा सक्त हुकूम आहे हे माहीत नाही का तुम्हाला ? जंगली कुठले ? त्या भयंकर, घाणेरड्या प्राण्याचे नाव काढले की माझ्या अंगाची लाही–लाही होते. अग आई ग–! "

राजेसाहेबांनी आजोबांना घाईघाईने पुढे नेले. आजोबांनी ओळखले की, ही बया अगदीच मूलघाणी दिसतेय. तिची कीव करत ते पुढे निघाले.

पण एवढ्याने भागले नाही हे त्यांना लवकरच दिसून आले.

ते थोडे पुढे जातात न जातात तोच एक दार धाडकन उघडले आणि बरे तर बरे, राजेसाहेबांनी तोल सावरला म्हणून नाहीतर ते घोड्यावरून खाली आले असते.

कारण त्या दारातून दोन मोलकरणी किंचाळत आल्या.

" धावा ! धावा ! मुलं ! ! मुलं ! ! ! "

त्या राजेसाहेबांच्या अंगावर आदळायच्याच पण थोडक्यात वाचल्या.

मोलकरणीच्या पाठोपाठ स्वयंपाकीणकाकू आल्या आणि त्या दारातच दोन्ही हातांनी डोके घट्ट धरून किंचाळू लागल्या,

" मेले ! मेले ! पोरटी आली. "

तो इशारा ऐकताच मोलकरणी आणि आजूबाजूच्या दासी पटपट उंच जागेवर चढल्या.

" मुलांना इथली मोठी माणसंही इतकी घाबरतात त्या अर्थी इथली कारटी भलतीच इब्लिस असली पाहिजेत हे उघड होते.

"काय गडबड आहे ?" तेवढ्यात तेथे येऊन पोचलेल्या राणीसाहेबांनी रागाने विचारले, "कसला गोंधळ माजवलाय ?"

"राणीसाहेब, पळा, मुलं आली. पळा, पळा." एक दासी प्राणपणाने ओरडली.

"म–म मुलं ! अयाई ग !" राणीसाहेब किंचाळून बेशुद्ध पडल्या.

राजेसाहेब सुद्धा हादरल्यासारखे झाले होते; पण त्यांनी अवसान आणून घोडा मुदपाकखान्यात घातला.

"पाहात उभे काय राहिलात नुसते अजागळासारखे ?" त्यांनी फर्मावले. "जा, मुलं पकडणाऱ्याला आणा बोलावून."

राजेसाहेबांचा हुकूम सुटल्याबरोबर राजवाड्याच्या दालनादालनांतून ललकारी गेली.

"मुलं पकडणाऱ्याला बोलवा. मुलं पकडणाऱ्याला बोलवा."

आणि ती ललकारी विरते न विरते तोच दुसरी ललकारी घुमत आली.

"आला, मुलं पकडणारा आला."

आणि त्यापाठोपाठ एक हडकुळ्या अंगाचा कुबडा तेथे दाखल झाला. त्याच्या एका हातात एक जाळे होते आणि दुसऱ्या हातात अणकुचीदार आकडा होता.

"मुलं ? कुठं निघालीत मुलं बघू." त्याने पुढे येत कर्कश आवाजात विचारले.

एव्हाना राणीसाहेब शूद्धीवर आल्या होत्या.

"त्या–त्या तिकडं स्वैपाकघरात." त्या भेदरलेल्या आवाजात इशारा करून म्हणाल्या.

" चला. बाजूला व्हा." मुलं पकडणारा म्हणाला, " सांभाळा. कोंडीत सापडलेली मुले म्हणजे फार भयंकर."

तो मुदपाकखान्यात शिरला.

आजोबांना डोळ्याच्या कोपऱ्यातून एका चुलाणात थोडी हालचाल दिसली. त्यांनी पाहिले.

तो एक मुलगा वैलात लपला होता. त्याच्या हातात त्यांना पावाचा तुकडा दिसला.

आजोबा श्वास रोखून गप्प राहिले.

पण मुले पकडणारा चांगला तरबेज दिसत होता. त्याने आत येऊन दीर्घ श्वास घेतला. एखाद्या श्वापदाने भक्ष्याचा माग घेण्याकरता हुंगावे तसे त्याचे ते करणे आजोबांना भासले. त्यांच्या जिवाचा थरकाप झाला.

आणि तो मुलं पकडणारा बरोबर कोपऱ्यातल्या चुलाणाच्या दिशेने झेपावलाच.

" आता जातोस कुठं, बच्चंजी ?" तो गरजला.

आजोबांनी पाहिले. मुलं पकडणाऱ्याला आपल्याच दिशेने येताना पाहून मुलगा चुलीबाहेर पडला.

आजोबांच्या छातीत धस्स झाले.

मुलं पकडणाऱ्याला हेच पाहिजे होते हे उघड झाले. त्याने जाळे डोक्यावर गरगर फिरवले आणि बरोबर नेम धरून फेकले.

आजोबांना पुढे पाहवेना. त्यांनी डोळे मिटून घ्यायचा प्रयत्न केला; पण आपण तसे करू शकत नाही, याची भीषण जाणीव त्यांना झाली. पण दुसऱ्याच क्षणी तेच बरे होते असा अनुभव त्यांना आला.

जाळे अंगावर येताना पाहून मुलाने जमिनीवर लोळण घेतली आणि तो तसाच लोळत जाऊन त्याच्या आटोक्याबाहेर गेला आणि काय होते हे समजण्याच्या आतच स्वयंपाकघरातून पार झाला.

मुलं पकडणाऱ्याच्या जाळ्यात काहीच गवसले नाही.

" मूर्ख ! नालायक ! " राणीसाहेब ओरडल्या. " साधं मूल पकडता येऊ नये तुम्हा लोकांना. फुकट अन्न खाता आमचं ! " त्या संतापातिरेकाने थयथया नाचू लागल्या.

" शांत व्हा, राणीसाहेब. शांत व्हा." राजेसाहेब त्यांच्या गुबगुबीत खांद्यावर हात ठेवून म्हणाले.

" शांत होऊ ? कशी शांत होऊ ?" राणीसाहेब करवादून म्हणाल्या, " सगळ्या राजवाड्यात पोरांचा सुळसुळाट झाला असताना मी शांत कशी राहू ?"

" राणीसरकार, " फजिती झालेला मुलं धरणारा कान पाडून म्हणाला, " मुलं गटारातून आत येतात."

" मग गटाराची तोंडं बुजवून टाका. मला काय सांगता ? नाहीतर सारा राजवाडा विषारी धुरानं धुऊन काढा."

" मुलं स्वैपाकघरात अन्न चोरायला येतात." मुलं धरणारा म्हणाला.

" मग साऱ्या अन्नात विष कालवा. मरू देत मेल्यांना खाऊन, तडफडून."

" जशी आज्ञा, राणीसरकार." मुलं धरणारा म्हणाला, " मी स्वत: जातीनं सारी व्यवस्था पाहतो."

" यापुढं वाड्यात पोर दिसलं तर गर्दन उडवली जाईल." राणीसाहेब गरजल्या.

आजोबांना ऐकवेना. तेवढ्यात राजेसाहेबांनी इशारा केला. पडत्या फळाची आज्ञा मानून आजोबा तेथून सटकले; पण आपण वैलातून निघून चुलीकडे चाललो आहोत हे त्यांना कुठे ठाऊक होते.

ते एका भरभक्कम गजाच्या दारापाशी आले. पहारेकऱ्याने किल्ल्या खळखळवीत पुढे होऊन लगबगीने दार उघडले.

" पहा कशी आहे आमची प्रयोगशाळा!" राजेसाहेब कौतुकाने म्हणाले. " तुम्हाला काही म्हणता काही कमी पडायचं नाही."

म्हणजे ही प्रयोगशाळा होती तर. भिंतीला लागून काही बाकं मांडली होती व त्यावर प्रयोगशाळेत लागणारे जुजबी सामान ठेवले होते; पण त्या सर्व सामानावर बोट-बोट धूळ साचलेली होती.

" हे तुमचे साहाय्यक." राजेसाहेबांनी बोट केले त्या दिशेने आजोबांनी पाहिले. " हे फार महान संशोधक आहेत हं प्रत्येकजण!"

पाच-सहा म्हातारी माणसं भिंतीलगत उभी होती.

त्या सर्वांच्या पायांत जाड-जाड साखळदंड बांधलेले होते आणि त्यांना जखडून टाकण्यात आलेले होते.

त्या साहाय्यकांची ती दशा पाहून हे आपल्याला कसली मदत करताहेत ते दिसतेच आहे. हे आजोबांनी ओळखले.

" आणि आता ही गाडी पहा" त्या अंधाऱ्या खोलीत चमकून दिसणारी एक नवी कोरी मोटार राजेसाहेबांनी दाखवली. तिथल्या उदास वातावरणात तिचे तिथे असणे जरा विचित्रच भासत होते.

" तुम्ही फक्त एवढंच करायचं. हिला पाण्यावर तरंगायला लावयाचं.'

" मोटार ? आणि पाण्यावर तरंगणार ?" आजोबांना काहीच समजेना. " कसं शक्य आहे हे ?"

" का बरं ? तुमची मोटार नाही का तरंगली पाण्यावर ?" राजेसाहेबांनी उलटतपासणी चालू केली.

ते काय बोलताहेत हे आजोबांना कळेना; पण या येडचापाच्या जरा कलानेच घेतलेले बरे हे त्यांना जाणवले. काहीतरी कारण सांगून कालहरण करणे भाग होते. आजोबा म्हणाले,

" राजेसाहेब, अहो हे काम सोपं का आहे ? आणि शिवाय माझी प्रयोगशाळा कुठं आहे इथं ?"

आपण बिनतोड सवाल केला असे आजोबांना वाटले; पण दुसऱ्याच क्षणी त्या अंधारकोठडीच्या एका कोपऱ्यात बोट दाखवीत राजेसाहेब विजयोन्मादाने म्हणाले,

" हात्तेच्या ! एवढंच ना ? ती पहा तुमची प्रयोगशाळा आम्ही बरोबरच घेऊन आलो आहोत."

आजोबांनी डोळे ताणून कोपऱ्यात पाहिले आणि जे पाहिले त्याने त्यांना हसावे का रडावे तेच कळेना.

कोपऱ्यात त्यांचा लाकडी संडास ठेवलेला होता. आता काय सांगणार कप्पाळ ! या वेडबंबू राजाला ती त्यांची प्रयोगशाळा वाटत होती तर ? पण राजाच्या तोंडावर त्याला हसणेही शक्य नव्हते.

" तुम्ही मोटारीला तरंगायला लावलं की मी तुम्हाला प्रधान करीन माझा." राजसाहेब लालूच दाखवीत म्हणाले. " पण–पण जर का तुम्ही चुकलात तर–तर तुमची गर्दन मारून कुत्र्याला खायला घालीन. आणि हे काम एक दिवसात व्हायलाच हवं."

अशी धमकी देऊन राजेसाहेब घोड्याच्या टापा खाडखाड वाजवत निघून गेले.

त्यांच्या पाठोपाठ दार ' कर्रर्र ' आवाज करत बंद झाले. राजेसाहेब गेल्यावर मात्र आजोबांना हसल्याशिवाय राहवेना. मघापर्यंतचे साचलेले सारे हसू खळाळून बाहेर पडले.

" बाकी काही म्हणा हं." ते आपल्या सोबत्याकडे पाहून म्हणाले. " मोठी वल्ली दिसते बरं का ही ! नाही का ?" आणि त्यांना हसण्याची पुन्हा जोरदार उबळ आली. परंतु त्यांच्या नव्या सोबत्यांपैकी कुणीही हसेना. उलट एकजण गंभीर आवाजात म्हणाला,

" हसू नका. राजेसाहेबांनी काही तुमची गंमत केली नाही. ते कधीच गंमत करत नाहीत. तुम्ही चुकलात तर ते आपलं म्हणणं शब्दशः खरं केल्याशिवाय राहणार नाहीत."

" आमची दशा पहा." एकजण म्हणाला, " आम्ही वर्षानुवर्षे अडकून पडलो आहोत इथं असे."

" मी बिघडलेला टेलिफोन दुरुस्त करायला आलो होतो.' तिसरा म्हणाला, " वीस वर्षांपूर्वी !"

" पण !" आजोबा वैतागाने म्हणाले, " तरंगणारी मोटार कशी शक्य आहे करणं. तुम्हीच सांगा."

" तुम्ही काळजी करू नका." त्यांचे सवंगडी म्हणाले.

" आम्ही तुम्हाला मदत करू."

आजोबांना अमळ बरे वाटले; पण दुसऱ्याच क्षणी त्यांना जाणीव झाली की, या साऱ्या मंडळींचा पूर्व-इतिहास पाहता हे कसली मदत करणार हे उघडच होते.

त्यांना आपल्या मुलाची तीव्रतेने आठवण झाली. त्याचे नेहमी काही तरी नवीन करणे चालू असते. तो इथे असता तर त्याने आपल्या बिचाऱ्या बापाची या संकटातून सुटका करण्यासाठी काहीना काही जरूर केले असते यात शंका नाही.

✦ ✦ ✦

या सुमारास इकडे प्रो.पॉटस्‌ही संशोधनातच गुंतलेले होते. आणि शिवाय संशोधन अगदी तातडीचे होते. कारण त्यात चार जिवांचा प्रश्न गुंतला होता. त्यांचा स्वतःचा, ट्रुली, जेरेमी आणि जेमिमा यांचाही. चिट्टी-चिट्टी बँग बँग जी कड्यावरून कोसळली ती थेट खाली समुद्राला भेटायलाच. क्षणाक्षणाने आणि वाढत्या वेगाने समुद्र प्रेमाने भेटायला पुढे पुढे येत होता. ते दृश्य पाहून जेरेमी आणि जेमिमा भेदरून किंचाळले. ट्रुलीने डोळे मिटून घेतले.

झाले. सारे संपले. समुद्रात पडणे म्हणजे डबक्यात पडणे नव्हते.

प्रो. पॉटस्‌ही हतबुद्ध होऊन गाडीतले सारे खटके दाबून पाहात होते. या खटाटोपात त्यांनी यापूर्वी कधीही हात न लावलेले तीन खटके दाबले गेले.

चिट्टी-चिट्टी बँग-बँग थरथरू लागली. धडधडू लागली. खोकू लागली. शिंकू लागली. तिच्या सर्वांगात हिव भरल्यासारखी ती थडथडू लागली. तिच्या खालच्या बाजूने करकर आवाज येऊ लागला.

प्रो. पॉटस्‌नाही ही काय नवी आफत आली ते कळेना. आपण चुकून भलतीच कळ दाबली असावी आणि आता स्फोट होऊन गाडीचे तुकडे होणार अशी भीती त्यांना वाटली. इतक्यात जेमिमा ओरडली,

" बाबा, बघा काय ते !" ती खाली वाकून पाहात होती.

प्रो. नी ती पाहात होती त्या दिशेला पाहिले.

गाडीच्या खालून पंख उलगडत होते. तिच्या मागच्या बाजूने प्रॉपेलर बाहेर येऊन त्याची घडीची पाती गरगर फिरू लागली होती.

क्षणाक्षणाला जवळ येणारा समुद्र वेगाने दूर दूर जाऊ लागला होता. गाडी वर, वर आणखी वर, आणि पुढे जाऊ लागली होती. हवेत तरंगत.

प्रो. नी स्टीअरिंग घट्ट पकडून धरले. हे काय होते आहे ते त्यांना कळेना. हे जे काय घडत होते ते सारे तर्कदुष्ट होते, अशास्त्रीय होते. मोटार पाण्यावर तरंगणे हीच अफलातून गोष्ट होती. आता तीच गाडी हवेत तरंगणे म्हणजे मग बोलायलाच नको.

" प्रोफेसर, ही मात्र कमाल केली हं तुम्ही !" ट्रुली कौतुकातिशयाने म्हणाली.

" अहो, मी यात काहीच केलं नाही." प्रो. सरळपणे म्हणाले. पण ट्रुलीला तो त्यांचा विनय वाटला. त्यामुळे तिला त्यांचे जास्तच कौतुक वाटू लागले.

चिट्टी-चिट्टी म्हणता म्हणता हवेशी गुजगोष्टी करू लागली. सर्वांनाच–विशेषत: ट्रुलीला आपले केस आवरता आवरता पुरेवाट होऊ लागली. खाली पाहिले तर डोळेच फिरू लागले; त्यामुळे सारेजण सरळ नाकासमोर पाहू लागले.

दूरवर आकाशात राजा बॉंबर्स्टचे बलून विमान एखाद्या ठिपक्यासारखे दिसत होते.

“आत्ता गाठूया आपण त्याला. जातेय कुठे?’ प्रो. ॲक्सिलरेटरवर पाय दाबून म्हणाले. चिट्टी-चिट्टी आणखी वेगाने पुढे निघाली. दोघांमधले अंतर हळूहळू कमी होऊ लागले. पण मध्येच एक ढग आडवा आला. काही वेळ आजूबाजूला चंदेरी धुक्याशिवाय दुसरे काही दिसतच नव्हते.

आणि दिसू लागले तेव्हा राजाचे विमान कुठल्याकुठे गडप झाले होते.

त्याला शोधण्याकरता प्रो. नी चकरा मारायला सुरवात केली. घटकेत झाडांच्या शेंड्यापर्यंत खाली यावे तर घटकेत उंच उंच वर चढावे असे त्यांनी आरंभले. आकाशातून कसली घरघर ऐकू येते हे पाहण्यासाठी शेतकरी हातातले काम थांबवून वर पाहात आणि उडणारी मोटार पाहून हतबुद्ध होऊन जात.

दूरवर एक सुंदर राजवाडा चमकला.

“तो पहा.” प्रो. आणि ट्रुली एकाच वेळी एकमेकांकडे पाहात एकमेकांना म्हणाले.

प्रो.नी नुसता राजवाडाच पाहिला होता; पण ट्रुलीला त्याच्या जवळच नांगरलेले विमान दिसले होते.

मग काय! प्रो. नी एक वळसा घेऊन चिट्टी-चिट्टीचे नाक सरळ किल्ल्याकडे खाली वळवले; आणि जवळ येताच त्याच्या बुरुजाभोवती चकरा घालायला सुरवात केली.

“धाड्ऽधाड्” चिट्टी-चिट्टीच्या खालून आवाज आला. प्रो. नी घाईघाईने मोर्चा वर आकाशाकडे वळवला.

“म्हणजे या लोकांनी विमान-विरोधी तोफांचा शोध पूर्णावस्थेला नेलेला दिसतोय.” प्रो. स्वतःशी चडफडले. त्यांना याची

कल्पना असती तर त्यांनी चिट्टी-चिट्टीला राजवाड्याच्या इतक्या जवळ नेण्याचे धाडस केलेच नसते.

"पण एकंदरीत हा राजा बॉम्बर्स्ट खुळाच दिसतोय." त्यांच्या मनात विचार आला, "या चिट्टी-चिट्टीकरता तो एवढा साता-समुद्रापलीकडून येऊन जीव टाकत होता. तिच्यावर तोफा डागू नयेत एवढेही त्या मूर्खाला कसं कळत नाही ?"

आपल्यावर तोफांचा मारा करणारा राजा बॉंबर्स्टच असला पाहिजे याची प्रो. ना खात्री होती. खाली राजवाड्याच्या बुरुजा-वर थयथयाट करणारा आणि वेड्यासारखे हातवारे करणारा तो माणूस राजा बॉंबर्स्टच असला पाहिजे यात शंका नव्हती.

प्रो. नी अजून एक चक्कर मारून राजवाड्याची टेहळणी केली. त्याच्या आवारातच उतरून आपल्या वडिलांना पळवून नेता येईल काय याचा अंदाज त्यांनी घेतला.

पण एकतर खाली माणसे खूप होती आणि शिवाय आजोबांना कुठे ठेवले आहे याचा त्यांना पत्ता नव्हता.

प्रो. नी चिट्टी-चिट्टीला दूर नेले. वाटेत एका खेड्यातल्या घराची छपरे दिसली. त्याच्या पलीकडे एका आडोशाला त्यांनी चिट्टी-चिट्टीला उतरविले. जमिनीला चाके टेकताच तिचे पंख आपोआप मिटले आणि आपल्या जागी जाऊन बसले.

गाडीतून उतरल्यावर सर्वजण मिळून राजवाड्याकडे निघाले. प्रो. नी आधी सर्वांना सांगून पाहिले की, मी एकटा पुढे जाऊन परिस्थिती पाहून येतो. पण त्यांना एकट्याला जाऊ देण्यास सर्वांनी विरोध केला. ते थोडे पुढे गेले; पण आकाशातून राजवाड्याचा माग काढणे सोपे असले तरी जमिनीवर ते तितकेसे

सोपे नाही असे त्यांना लवकरच आढळून आले. चालता-चालता ते त्यांना चिट्टी-चिट्टीमधून दिसलेल्या गावाच्या वेशीपाशी येऊन पोहोचले. एक म्हातारा शेतकरी लाकडाची मोळी घेऊन चालला होता. त्याला राजवाड्याचा रस्ता विचारावा म्हणून प्रो. नी हटकले; पण त्याला त्यांचा प्रश्न समजल्यासारखाच दिसला नाही. प्रो. नी आणि ट्रुलीनेही तो प्रश्न वेगवेगळ्या भाषेत विचारून पाहिला; पण रामा! शिवा!! गोविंदा!!! तो म्हातारा त्यांच्याकडे आणि जेरेमी-जेमिमा यांच्याकडे आळीपाळीने टकमक पाहात राहिला. एकाएकी त्याच्या अंगाला कंप सुटला. इतका कंप की त्याच्या डोक्यावरच्या भाऱ्यातली लाकडे गळून पडू लागली आणि मग तो एकदम त्यांच्या बाजूने सटकला आणि दुडक्या चालीने निघून गेला.

"वल्लीच दिसतोय म्हातारा!" प्रो. म्हणाले, "आपण गावात जाऊन विचारू या."

पण गावात त्यांना सर्वत्र शुकशुकाट दिसला. सर्व घरांची दारे, खिडक्या बंद होत्या. रस्त्यावर कुणीही जाता येताना दिसत नव्हते. जेमिमा घाबरल्यासारखी झाली. ट्रुलीने तिला धीर दिला. ते तसेच पुढेच निघाले. त्यांना गावाची मुख्य बाजारपेठ लागली. इथे माणसांची थोडीफार चाहूल दिसत होती. पण त्यांच्या हालचाली दबकत-दबकत होत होत्या. कुणी बोलत नव्हते. गात नव्हते. हसत नव्हते. सर्वत्र अवकळा पसरली होती. त्यांनी कुणाचे लक्ष वेधून घ्यायचा प्रयत्न केला तर ते घाईघाईने दृष्टी दुसरीकडे वळवीत निघून जात. मात्र ते आपल्याकडे टवकारून पाहताहेत, विशेषतः जेरेमी आणि जेमिमाकडे तर फारच डोळे फाडफाडून बघत आहेत हे प्रो. ना दिसले.

“ अरेच्या ! ” प्रो. वैतागाने म्हणाले, “ यांनी जन्मात पोरं कधी पाहिलीच नाहीत का काय ? ”

“ तुमच्या लक्षात आलेलं दिसत नाही. ” ट्रुली दबक्या आवाजात म्हणाली, “ रस्त्यावर एकसुद्धा लहान मूल दिसत नाही. ”

प्रो. बुचकळ्यात पडले. त्यांनी एकदोघांना रोखून त्यांच्याकडून खुलासा काढायचा प्रयत्न केला; पण त्यांनी तसे करताच जणू भूत दिसल्यासारखे ते लोक शेजारच्याच गल्लीतून पसार झाले. एवढ्यात बिगुलाचा आणि घोड्यांच्या टापांचा आवाज आला. त्याबरोबर बाजारात मरगळून चालणाऱ्या लोकांच्या अंगात कसला तरी संचार झाल्यासारखी पळापळ सुरू झाली. दिसेल त्या आडोशाआड जाऊन लोक लपले. दारे बंद केल्याचे धडाधड आवाज, अडसर सरकवल्याचे आवाज, कुलूप लावल्याचे आवाज असा एकच कोलाहल माजला.

आणि नंतर स्मशानशांतता पसरली.

“ शुक्, शुक्, अहो तिकडे कुठे निघालात ? ”

त्यांच्या कानावर पहिल्या माणसाचा आवाज पडला. तो आवाज कुठून येतो हे त्यांनी अचंब्याने पाहिले तेव्हा एका खेळण्यांच्या दुकानाचे दार अर्धवट उघडे असून आतून दुकानदार त्यांना खुणावतो आहे असे त्यांना आढळले.

“ चला, पोरांना घेऊन आत या चटकन. ” तो म्हणाला.

“ पण--” प्रो. नी काही विचारायचा प्रयत्न केला.

“ पण नाही; परंतु नाही. आत्ता शिपाई येऊन पोहचतील इथं. लवकर या आत. ” दुकानदार म्हणाला.

प्रो. ना इतकी घाई बरी वाटली नाही. सर्व गोष्टीची कशी सांगोपांग माहिती मिळवायला हवी; पण ट्रुलीने दुकानदाराच्या आवाजातली आर्तता ओळखली आणि जेरेमी व जेमिमा यांचे वखोट धरून ती तडक आत शिरली. तिच्या मागोमाग प्रो. ही आत गेले. ते आत दाखल होताच दुकानदाराने दार बंद करून घेतले आणि कडी घातली.

" हं आता सांगा पाहू हे सारं काय चाललंय ते. " प्रो. नी विचारले.

" इथल्या कायद्याप्रमाणे आई-बापापासून त्यांची लहान मुलं हिरावून घेऊन त्यांना पिंजऱ्यात ठेवण्यासाठी नेण्यात येते. " दुकानदाराने खिडक्या लावता-लावता खुलासा केला.

" काय म्हणता ? " प्रो. नी आ वासला.

पण दुकानदाराने त्यांच्या नवलाईकडे लक्ष दिले नाही. त्याने त्यांना दुकानाच्या जमिनीवरच असणाऱ्या एका चोर-दरवाज्याकडे नेले; आणि तो उघडून त्याने त्यांना आत तळघरात उतरायला सांगितले.

" का ? पण का ? " प्रो. नी चिवटपणे विचारले.

" का आणि कसं ? " दुकानदार वैतागाने म्हणाला.

" सारा खुलासा करत बसायला वेळ नाही. आधी खाली व्हा चटकन. "

" तरीपण-" प्रो. आत उतरता-उतरता चिवटपणे उद्गारले.

दुकानदाराने वैतागाचा निश्वास टाकला आणि तो म्हणाला, " इथली राणी किनई फार दुष्ट आहे. ती मुलांचा फार दुस्वास करते. आपण नेहमी कुक्कुलं बाळच राहावं असं तिला

वाटतं. त्यामुळे खऱ्याखुऱ्या बाळांचा ती द्वेष करते. मुलं पाहिली की तिचं डोकंच फिरतं आणि आता पळा. आणि मी येईपर्यंत इथंच थांबा. आवाज मात्र अजिबात करू नका कुणी. "

इतक्यात घोड्यांच्या टापा जवळ ऐकू येऊ लागल्या, म्हणून त्याने घाई-घाईने चोर-दरवाजा बंद केला आणि त्याच्यावर जाजम लोटले.

✦ ✦ ✦

शिपायांच्याबरोबर मुले धरणाऱ्याचा फेरा आला होता. त्याला आजचा दिवस पर्वणीसारखाच होता. राज्यातली सारी मुले पकडून झाली होती किंवा त्यांच्या आई-बापांनी त्यांना देशांतराला तरी पाठवून दिलेले होते. कसे का होईना राज्य निर्मूल झाले होते. त्यामुळे आताशा पहिल्यासारख्या मुले धरायच्या मोहिमा काढायला मिळत नव्हत्या. हां. राणीसाहेब फारच भित्र्या असल्याने त्यांना जिथे तिथे मुलेच दिसत त्यामुळे काही काळ सनसनाटी माजे परंतु शेवटी निराशाच पदरी येई.

पण आज मात्र उडत्या मोटारीतून दोन मुले राज्यात उतरल्याची नक्की बातमी मिळाली होती. त्या मोटारीत केवळ जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी मुले दिसणाऱ्या राणीसाहेबांनीच नव्हे तर खुद्द राजेसाहेबांनी आणि दरबारी मंडळींनीही मुले पाहिली होती. आणि ती मोटार इथेच आसपास कुठेतरी उतरली होती. मुलांनी इथेच जवळपास आसरा घेतला असणार. आजचा दिवसही छान होता. मंद मंद वारा वाहात होता. मग त्यांचा वास लागायला कितीसा उशीर ?

शिपायांनी घराघरांत शिरून हडेलहप्पी तपासणी सुरू केली होती. घरधन्याने बऱ्या बोलाने दार उघडले तर बरेच, नाहीतर

ते खुशाल दारे फोडून घरात प्रवेश करीत; पण मुले धरणाऱ्याचे काम असे धसमुसळेपणाचे नव्हते. काही झाले तरी तो कलाकार होता. आपल्या तरबेजपणाचा त्याला अभिमान होता.

तो चौकात उभा राहिला आणि त्याने आजूबाजूला बारकाईने निरीक्षण केले.

-- आणि त्याची दृष्टी बरोबर खेळण्याच्या दुकानावर स्थिर झाली.

आज एवढा दिवस स्वच्छ असताना हे दुकान बंद का ?

त्याने शिपायांना घेऊन दुकानाचे दार ठोठावले. दुकानदाराने ते त्वरेने उघडले. तरीपण ते उघडताच त्याला बाजूला ढकलून सर्वजण आत घुसले.

पानाड्याला जमिनीतल्या पाण्याचा माग लागल्याबरोबर त्याच्या अंगात संवेदना यावी तसे मुले धरणाऱ्याला झाले. त्याच्या हातात पायात झिणझिण्या येऊ लागल्या. त्याचे नाक फुरफुरू लागले.

मुले तिथे होती एवढेच नव्हे, तर एवढ्यातच ती तिथे आलेली दिसत होती. कारण वास अगदी ओला होता.

त्याची कावळ्यासारखी नजर विस्कटलेल्या जाजमावर पडली. त्याने त्याच्यावर झडप घालून ते एका झटक्यात बाजूला केले आणि त्याच्या खालचा चोर-दरवाजा दिसताच विजयानंदाची आरोळी ठोकली.

दुकानदाराचा चेहरा काळा-ठिक्कर पडला.

"जातोस कुठं, बच्चंजी ?" मुले धरणारा दात करकरा खात म्हणाला, "तुझ्या दातांची नेकलेस आणि डोळ्यांच्या ईयरिंग्ज करून राणीसाहेबांना नजर करतो थांब."

दोन शिपाई तळघरात उतरले. पण ते थोड्याच वेळात परत आले.

“खाली कुणीच नाही.” ते म्हणाले.

“म्हणे खाली कुणी नाही,” मुले धरणारा त्यांना वेडावीत म्हणाला. हा धडधडीत त्याच्या विद्येचा अपमान होता. “अगदी कुचकामाचे आहात तुम्ही. चला व्हा बाजूला.”

तो स्वतः आत उतरला.

आत जुन्या–पुराण्या, मोडक्या–तोडक्या खेळण्यांचा खच पडलेला होता. या पसाऱ्यातच कुठेतरी मुले दडून राहिली असावीत हे नक्की. या बिनडोक शिपायांना बघायलाच नको बेट्यांना, दुसरे काय ? त्याने निर्धाराने शोधायला सुरवात केली. दुकानदारही कर्तव्य म्हणून त्याला मदत करायला आत उतरला.

“चल वर हो.” मुले धरणारा त्याच्यावर वसकला.

“माझा तुझ्यावर विश्वास नाही. मुलांना बंदी असणाऱ्या या देशात खेळण्याचा व्यापार करणारे तुम्ही सारे लोक बेभरवशाचे आहात.”

“प–पण, महाराज, माझी सर्व खेळणी फक्त राजेसाहेबांच्या करमणुकीसाठीच असतात.” दुकानदार कसेबसे म्हणाला.

मुले धरणाऱ्याने खेळण्यांच्या पसाऱ्यात मुलांचा शोध नेटाने चालवला. त्यात तो दोन–चारदा अडमडला. मध्येच खेळण्याची खोकी गडबडीत उघडल्याने आतली स्प्रिंगची खेळणी ताडकन उडून त्याच्या नाकाडावर बसत आणि त्याला नाक चोळण्याचा प्रसंग येई. शिपाई हसू दाबण्याचा प्रयत्न करीत. पण त्या सगळ्याकडे दुर्लक्ष करून त्याने आपले काम चिकाटीने चालवले.

एकटचा त्याच्याच मनाची गोष्ट असती तर त्याने मुले सापडल्याशिवाय शोध थांबवलाच नसता; पण एवढचात बाहेरून आरोळी आली.

"सापडली! सापडली!! उडणारी मोटार सापडली!"

ती ऐकू येताच मुले धरणाऱ्याच्या निषेधाला न जुमानता शिपायांनी शोधाशोध थांबवली आणि ते वर पळाले. मुले धरणारा त्यांच्या पाठोपाठ पाय आपटत वर आला. पण त्याच्याकडे कुणी लक्ष दिले नाही. जो तो चिट्टी-चिट्टी माग धावत होता.

दोन घोडे चिट्टी-चिट्टीला जुंपलेले होते आणि ती बाजारपेठेच्या चौकात आणली जात होती. तेथे पोहोचल्याबरोबर ती राजवाडचात नेण्याची अच्छी-खाशी मिरवणूक सुरु झाली.

मुले धरणारा चडफडत मागून चालू लागला.

राजेसाहेबांनी चिट्टी-चिट्टी पहाताच टाळचा वाजवत धडपडत ते पायऱ्या उतरून खाली आले आणि तिच्यात बसले.

"आता ही माझी झाली. ते आनंदातिशाने गाडीवर हात फिरवीत म्हणाले. नंतर त्यांनी तिच्या निरनिराळचा कळा फिरवून तिला हुकूम सोडायला सुरवात केली. "चल ऊठ. भरारी मार अस्मानात. मी राजा बॉम्बर्स्ट फर्मावतो आहे तुला."

पण चिट्टी-चिट्टीने त्यांचे हुकूम धुडकावून लावले. ती जागच्या जागी गप्प उभी राहिली.

"जा. त्या संशोधकाला आणा बोलावून" त्यांनी हुकूम सोडला. थोडचाच वेळात आजोबांना तेथे हजर करण्यात आले.

"अरेच्च्या!" आजोबा उद्गारले, "ही चिट्टी-चिट्टी इथे काय करतेय?"

" चला, " राजेसाहेबांनी आज्ञा केली, " तुम्ही हिचे संशोधक आहात. तुम्ही हिला उडायला लावा."

" काय म्हणता ? उडायला ? " आजोबा आ वासून म्हणाले. आधीची फर्माइश तिला फक्त पाण्यावर तरंगवण्याची होती. आता ही नवी फर्माइश झाली होती. पण तेवढ्यात त्यांना परिस्थितीचे भान आले. राजेसाहेबांच्या कलाने घ्यायला हवे हे त्यांना आठवले. ते म्हणाले, " हात्तेच्या ! एवढंच ना ? चला."

आजोबा राजेसाहेबांच्या शेजारी बसले आणि त्यांनी खटक्याला हात घातला.

" थांबा थांबा मी आले." तेवढ्यात राणीसाहेबांची हाक आली आणि त्या दडदड पायऱ्या उतरून खाली आल्यासुद्धा.

राजेसाहेबांनी निश्वास सोडला.

" आली ही बया ! " ते हलक्या आवाजात म्हणाले, " जरा मी कुठं काही करावं म्हटलं तर ही अडमडलीच तिथं. प्रो. तुम्ही एवढे शोध लावता तर आता एखादा शोध असा लावा की हिची ब्याद कायमची टळेल."

एवढ्यात राणीसाहेब मागच्या सीटवर जाऊन बसल्याच.

" हं ! चला आता, " राजेसाहेब म्हणाले.

आजोबांनी गाडीतल्या खटक्यांशी झटापट सुरू केली. हा खटका दाव. तो पुढे ओढ. असे ते करत राहिले. तोंडाने त्यांची ' रनिंग कॉमेंटरी ' चालू होतीच.

" अरेच्च्या, हा नाही. हा वाटतं. नाही नाही तो हं. आता संभाळून वसा बरं का ! "

तेवढ्यात मागच्या सीटवरून स्प्रिंग उलगडल्याचा आवाज आला आणि त्याच्या पाठोपाठ राणीसाहेबांचा ' मेले मेले ' असा आक्रोश आला. आजोबांनी चमकून मागे वळून पाहिले.

राणीसाहेबांची सीट त्यांच्यासह आकाशात उंच उंच आणखी उंच उडाली होती. आजोबा बावरले.

पण राजेसाहेब पोट धर-धरून हसू लागले होते.

आजोबांचा जीव भांड्यात पडला.

पण मुले धरणाऱ्याला हा सारा थिल्लरपणा अजिबात पसंत पडला नाही.

" काय हा पोरकटपणा ? " तो स्वतःशीच पुटपुटला; पण त्याचे पुटपुटणे घशातच अडकले.

पोरकटपणा ! हा घाणेरडा शब्द आपल्या मनात कुठून आला. छे: ! छे: ! या पुढे संभाळायला हवे. त्याने स्वतःला बजावले.

पण त्या शब्दानेच त्याला आपल्या फसलेल्या कामगिरीची आठवण झाली. गावात दोन मुले मोकळी असताना आपण स्वस्थ बसणे इष्ट नाही. काहीही करून त्यांना हस्तगत करणे जरूर होते.

✦ ✦ ✦

मुले धरणारा तळघरात उतरला होता. तेव्हा तो बरोबर मागावर होता. एकदा तर त्याचा वाकडा पंजा जेमिमाच्या अगदी जवळून गेला. ती घाबरून ओरडणार होती पण ट्रूली मावशीने आपल्याला बिलकुल आवाज करायचा नाही असे बजावल्याचे तिला आठवले. आणि तिने मोठ्या शर्थीने किंचाळी दाबली.

तेवढ्यात बाहेरून कसला तरी कोलाहल ऐकू आला, म्हणून मुले धरणारा तेथून गडबडीने शिपायांसह निघून गेला. थोड्या वेळाने सर्वत्र सामसूम झाल्यावर दुकानदाराने अलबेलचा इशारा दिला. तेव्हा चौघेही सावधगिरीने बाहेर आले.

" तुम्ही लोक परदेशी दिसता. " दुकानदार म्हणाला, " तुम्ही या देशात कसे वाट चुकलात मला माहिती नाही; पण तुम्ही ताबडतोब हा देश सोडून निघून जावं अशी माझी तुम्हाला आग्रहाची सूचना आहे. "

" का बरं ? " प्रो. नी चिडून विचारले. " असं भागूबाईसारखं पळून जाण्यापेक्षा या दुष्ट राजाशी दोन हात करणंच बरं नाही का ? " चिट्टी-चिट्टीला राजाने पळवल्याने ते चांगलेच चिडले होते.

" हे म्हणायला सोपं आहे पण फार कठीण काम आहे. तुम्हाला राजा बॉम्बर्स्टच्या सामर्थ्याची कल्पना नाही. म्हणून तुम्ही असं बोलताय. एकतर त्याचा राजवाडा म्हणजे एक अभेद्य किल्ला आहे आणि त्याचा बंदोबस्तही कडक आहे. मुंगीलासुद्धा आत रिघायला वाव मिळायचा नाही " दुकानदार म्हणाला.

" आपण एकदा त्या राजवाड्याची सर्व बाजूंनी टेहळणी करून पाहू या तर खरे कुठून आत शिरकाव करायला वाव मिळतो का ?" प्रो. नी सुचवले; आणि मग बरीच भवती न भवती होऊन अखेर दुकानदाराचे मन या कामी आपल्याला सहाय्य करण्यासाठी त्यांनी वळवले.

" आम्ही परत येईपर्यंत येथून हलू नका बरं का ?" असे ट्रुलीला आणि मुलांना बजावून प्रो. दुकानदारासह त्या कामगिरीवर रवाना झाले देखील.

समुद्राकाठच्या वनभोजनानंतर सर्वच घटना इतक्या वेगाने एकापाठोपाठ एक घडत गेल्या, की कुणालाही स्वत:कडे लक्ष द्यायला सवडच झाली नाही. आता प्रो. परत येईपर्यंत काही करणे शक्य नव्हते, तेव्हा मुलांना आणि ट्रुलीलाही आपल्याला खूप भूक लागली असल्याची जाणीव झाली.

" मावशी, माझ्या पोटात तोडतंय ग !" जेमिमा कळवळून म्हणाली. जेरेमी ओठ आवळून गप्प राहिला; पण त्याचीही अवस्था तीच झाली असणार हे ट्रुलीने ओळखले. तिने दुकानात हुडकून पाहिले; पण त्या खेळण्याच्या दुकानात खायचा पदार्थ कोठून येणार ?

" आपण बाबा येईपर्यंत थांबू या " असे तिने मुलांना सुचवले. मुलेही वरकरणी गप्प राहिली; पण ट्रुलीलाच त्यांचे भुकेने काळवंडलेले चेहरे पाहवेनात. ती मोठ्या धर्मसंकटात पडली. आपण परत येईपर्यंत जागचे हलू नका असे प्रो. नी बजावले होते; पण त्यांच्या कामगिरीवरून त्यांना परत यायला किती वेळ लागणार हे अनिश्चित होते. तोपर्यंत मुलांना थांबायला सांगणे म्हणजे क्रूरपणा होता. शेवटी तिने मनाचा हिय्या केला. मुले बाहेर पडली तर त्यांना धोका होता. ती स्वत: तर मोठी होती. तिला बाहेर जाऊन यायला तशी काही हरकत नव्हती. तिने मुलांना 'मी येईपर्यंत कुठ्ठं कठ्ठं जायचं नाही' असे वारंवार बजावून ती अन्नाच्या शोधार्थ बाहेर पडली. दुकानात जेरेमी आणि जेमिमाच फक्त राहिली.

ट्रुली मावशी जाऊन बराच वेळ झाला तेव्हा दोघांचेही उसने अवसान गळू लागले. एवढ्यात घोडागाडीचा आवाज आणि त्याच्या पाठोपाठ फेरीवाल्याची आरोळी आली.

"आला रे आला, फेरीवाला,
चला मुलांनो, चला रे चला
फिरवून आणीन गावभर
मिठाई देईन पोटभर."

दोघांच्याही तोंडाला पाणी सुटले. पोटात कावळे कोकलत होतेच. त्यांना मोह अनावर झाला. बाबा आणि ट्रुलीमावशीने दिलेली ताकीद विसरली गेली. ती दोघेही दार उघडून फेरीवाल्याच्या गाडीमागे धावत सुटली.

"अरे, अरे पोरांनो, पळा आत जा." एका म्हातारीने त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला; पण तो इशारा ऐकण्याच्या मन:स्थितीत दोघांपैकी कुणीच नव्हते. मुलेच नसणाऱ्या देशात मुलांसाठी खाऊ आणि तोही फुकट वाटणारा फेरीवाला दिसणे म्हणजे तो एक वेडापीर तरी असला पाहिजे किंवा त्यात काहीतरी धोका असला पाहिजे, हे त्या म्हातारीने ओळखले होते आणि जेरेमी आणि जेमिमा यांना सावध करण्याचा प्रयत्न केला होता; पण तो फुकट गेला.

गाडी पुढे चालली होती आणि जेरेमी आणि जेमिमा तिच्यामागे पळत चालले होते. त्यांना वाटले, आपल्याला गाडी कधीच गाठता येणार नाही. पण अचानक गाडीचा वेग कमी-कमी होऊ लागला. त्यांच्या लक्षात हा फरक आला नाही. त्यांना वाटले आपणच जोरात धावून गाडी गाठलीच.

"या मुलांनो, आलात?" गाडीवाला आर्जवाने म्हणाला. गाडीवाल्याने कसे विदूषकासारखे गमतीचे कपडे घातलेले होते. गाडीही चित्र-विचित्र रंगाच्या कागदांनी शोभिवंत केलेली होती

आणि गाडीवाल्याचा आवाजही किती आर्जवी होता. अन् शिवाय तो खाऊ फुकट देणार होता.

"काय हवं पोरांनो तुम्हाला ? पिस्त्याचं आईसफ्रूट की काही तरी गरमागरम खमंग–"

"खमंगच द्या काहीतरी." जेरेमी म्हणाला.

"या. हे घ्या गरमागरम." गाडीवाला सीटवरून खाली उतरून गाडीच्या मागे येत म्हणाला आणि त्याने त्यांच्यापुढे दोन खमंग खाऊ धरले. दोघांनीही अधाशीपणे हात पुढे केले. तेवढ्यात गाडीवाल्याने एका दोरीला झटका दिला. त्याबरोबर गाडीवर लटकवलेले शोभिवंत कागद बाजूला पडून आतला मुले पकडण्याचा पिंजरा दिसला.

तो गाडीवाला खराखुरा फेरीवाला नसून वेषांतर केलेला मुले धरणारा होता हे जेरेमी आणि जेमिमाला उमगले. पण आता उशीर झाला होता. त्यांनी पळायचा प्रयत्न केला; परंतु मुले धरणाऱ्याने एका झटक्यात त्यांना पकडून पिंजऱ्यात डांबले आणि गाडीचा मोहरा वळवून ती राजवाड्याकडे जोराने पिटाळली.

तो राजवाड्यात पोहोचला तेव्हा त्याला उडणाऱ्या, तरंगणाऱ्या मोटारीने तसे काहीही केले नाही. ती आहे तेथेच ढिम्म बसून आहे असे आढळून आले. त्याने जवळ जाऊन राणीसाहेबांना लवून कुर्निसात केला आणि त्यांना अभिमानाने पिंजरा दाखवून तो म्हणाला,

"पाहिलंत राणीसाहेब, दोन दुर्लभ परदेशी नमुने पकडून आणलेत."

बाळसेदार जेरेमी आणि जेमिमा यांना पाहून राणीसाहेबांच्या काळजाचा थरकाप झाला.

"काय तरी बाई, घाणेरडी मुलं !" त्या नाक फेंदारून म्हणाल्या.

"पण पिंजरा नीट बंद केलायस ना ? नाहीतर ही जात फार धोकेबाज !"

"काळुंद्री !" जेरेमी जीभ काढून राणीला वेडावत म्हणाला.

"आमच्या बाबांना येऊ देत तर खरे आणि मग बघा मजा." जेमिमाने धमकावले.

"ते सारा राजवाडाच उडवून देतील."

"जा. यांना आत्ताच्या आत्ता माझ्या समोरून घेऊन जा आणि मनोऱ्यावर कैदेत टाका." राणीसाहेब किंचाळल्या. संतापातिरेकाने त्यांच्या तोंडाला बोलता-बोलता फेस येऊ लागला.

"तू दुष्ट थेरडी आहेस." जेमिमाने जाता जाता ओरडून सांगितले.

"आणि विद्रूप पण !" जेरेमीने तिच्या आवाजात आवाज मिळवला.

राणीसाहेबांचा त्यांच्या उभ्या आयुष्यात असा कुणी अपमान तोंडावर केला नव्हता. आणि तोही मिरमुटल्या कारटयांनी करावा ? संतापाने त्यांना वायू झाला.

आणि त्या धाडकन बेशुद्ध पडल्या.

✦ ✦ ✦

ट्रुली परत आली तेव्हा तिला जेरेमी आणि जेमिमा कोठेही दिसेनात तेव्हा ती हवालदिल झाली. आणि तिला त्या दोघांना

मुले धरणाऱ्याने पकडून नेल्याची बातमी कळली तेव्हा तर तिची शुद्ध हरपायचीच तेवढी बाकी राहिली. आता ती प्रो. ना कसे तोंड दाखवू शकणार ? त्यांना काय सांगणार ? त्यांनी जाताना वारंवार बजावून सांगितले होते की त्यांना सोडून कुठे जाऊ नकोस म्हणून. आपण त्यांना एकटे सोडून जायला नको होते.

तेवढ्यात तिला चौकात प्रो. पॉटस् येताना दिसले. ती धावत त्यांच्याकडे गेली. प्रो. नी तिला तशा अवस्थेत येताना पाहून ओळखले की काही तरी बिनसले आहे.

" काय गं काय झालं ? " त्यांनी विचारले; पण भावनातिरेकाने ट्रुलीला काहीच धड सांगता येईना. शेवटी हळुवारपणे प्रो. नी तिच्याकडून एक एक गोष्ट काढून घेतली.

आपली मुले पळवली गेली आहेत हे कळताच त्यांचा चेहरा कठोर झाला. ट्रुली सारा दोष आपल्यावर घेऊ पहात होती; पण प्रो. नी ओळखले की त्यांना तशा अवस्थेत सोडून गेलो ही आपलीच चूक झाली. त्यांनी ट्रुलीची कशीबशी समजूत काढली. मग ते दुकानदार मित्राकडे वळून निश्चयी आवाजात उद्गारले.

" बस्स ! ठरलं ! राजवाड्यात शिरायचंच. "

" अहो पण ! " दुकानदार अचंब्याने म्हणाला, " आपण आताच पाहून आलोत ना की बंदोबस्त किती कडक आहे ते. "

" ते मला ठाऊक आहे. " प्रो. म्हणाले. " पण तरीही मी माझ्या निश्चयापासून ढळणार नाही. काही तरी मार्ग काढीनच. "

" हे तुम्ही बोलत नाही. तुमचा पुत्रशोक बोलतोय. नीट थंड डोक्याने विचार करा म्हणजे तुम्हालाच तुमच्या विचारातला

फोलपणा कळून येईल. " पण प्रो. अटळ राहिले. त्यांचा तो दृढ निश्चय पाहून दुकानदारही द्रवला.

" तर मग मीही येतो तुमच्या बरोबर. " तो म्हणाला. " आपण आज रात्री निघू या. "

प्रो. ताबडतोब जायला आतुर झाले होते; पण दुकानदाराने अंधार पडल्यावर जाण्यात अधिक सुरक्षितता आहे हे पटवून दिल्यावर प्रो. ची खात्री पटली.

रात्री सर्व जग अंधारात बुडाल्यावर तो, प्रो. आणि ट्रुलीला घेऊन रानातून आडमार्गाने निघाला. काही वेळाने ते एका तळ्याच्या काठी येऊन पोहोचले. पैलतीरावर राजवाड्याची अंधुकशी बाह्य आकृती दिसत होती. पाण्याकाठी माजलेल्या बोरूंतून दुकानदाराने एक नाव बाहेर काढली. आणि त्याने दोघांना त्यात बसायला सांगितले.

" आपण कुठं निघालो आहोत ? " प्रो. नी बुचकळ्यात पडून विचारले.

" जरा धीर धरा. यथावकाश समजलेच. " दुकानदार म्हणाला. नाव आवाज न होऊ देता, सावकाश वळवत त्याने ती पैलतीरावर आणली. प्रो. ना भीती वाटली की न जाणो कुठल्याही क्षणी बुरुजावरून आरोळी येईल आणि गोळीबार सुरू होईल. पण तसे काही झाले नाही. लवकरच त्यांची नाव एका खडकाआड झाली. तेथून ती बुरुजावरच्या कुणाला दिसणे शक्यच नव्हते. नाव एका बाहेरून सहजासहजी न दिसणाऱ्या गुहेत शिरली. खंळणीवाल्याने वल्ही ठेवून दिली आणि नाव आपोआप जाऊ दिली. थोड्याच वेळात गुहा चांगली रुंद झाली आणि तिच्यात अनपेक्षितपणे प्रकाश तळपला.

ट्रुलीने आ वासला.

आत प्रशस्त कट्ट्यावर म्हाताऱ्या बायका आणि मुले शेकोटच्या भोवती किंवा दिव्याभोवती कोंडाळी करून बसली होती. कुणी झोपले होते, कुणी खात बसले होते.

"ही आमची मुले बाळे आहेत." खेळणीवाला म्हणाला,

"गेल्या अकरा वर्षापासून आम्ही त्यांना इथे दडवून ठेवत आहोत," नंतर तो विषण्ण हसून म्हणाला, "बाकी ही जागा इतकी सुरक्षित आहे की राजाच्या बापालाही तिचा पत्ता लागायचा नाही, कारण ही जागा मुळी राजवाडयाच्या खालीच आहे." पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या चेहऱ्यावरचे ते हसूही नाहीसे झाले, "पण या बिचाऱ्यांनी आयुष्यात आतापर्यंत कधी झाड पाहिले नाही की सूर्य उगवताना यांना दिसला नाही."

नाव थांबताच गुहेत एक शीळ घुमली. ती शीळ कुठून आली हे पाहण्यासाठी प्रो. नी वर पाहिले. गुहेच्या भिंतीला पाय फुटल्यासारखे दोन पाय बाहेर आले आणि पायापाठोपाठ एक सबंध मुलगाच बाहेर आला. प्रो. नी लक्षपूर्वक पाहिले तेव्हा कुठे त्यांच्या ध्यानात आले की, तो मुलगा भिंतीतून उपटला नसून एका गटाराच्या तोंडातून उतरला होता. त्याच्या पाठीवर एक आटयाची गोणी होती. ती त्याने शेकोटीपुढे टाकली. त्या मुलाच्या पाठोपाठ आणखी एक मुलगाही त्याच्या प्रमाणेच आटयाचे पोते घेऊन गुहेत उतरला.

"या बिचाऱ्यांना उंदीर–घुशीसारखं गटारातून जाऊन शाही मुदपाकखान्यातून अन्नधान्य चोरून आणावं लागतं." खेळणीवाला म्हणाला.

होडीतून नवख्या माणसांना उतरताना पाहून मुले त्यांच्या जवळ आली. खेळणीवाल्यानं त्यांना प्रो. ची आणि ट्रुलीची ओळख करून दिली; आणि प्रो. च्या गोंडस पोरांना राजाच्या मुले धरणाऱ्याने पळवून राजवाड्यात कैदेत ठेवल्याचे सांगितले. नुसत्या मुलांनाच नव्हे तर त्यांच्या आजोबांना सुद्धा. राजवाड्यात चोर-मार्गाने जाऊन आलेल्या एका मुलाने जेरेमी, जेमिमा आणि आजोबांना कुठे ठेवले आहे याची माहिती पुरवली.

प्रो. नी गटाराच्या तोंडाकडे पाहिले.

" हे गटार थेट राजवाड्यात जाऊन पोहोचतं तर !" ते स्वतःशी पुटपुटले. या गोष्टीने बऱ्याच शक्यता निर्माण झाल्या होत्या.

" महाराज, आपण आमची सुटका करण्यासाठी येथे आलात काय ?" एका मुलाने केविलवाणेपणे विचारले.


" आम्हाला खरंच बाहेर घेऊन चला हो." दुसरा एक काकुळतीने म्हणाला." अगदी कंटाळा आला आहे." प्रो. ना खूप सांगावेसे वाटले की मी तुमचा उद्धारकर्ता म्हणून येथे दाखल झालो आहे; पण एक तर तसे म्हणणे म्हणजे त्यांची क्रूर थट्टा झाली असती. तरी पण त्यांना त्यांच्या मुद्रेवरचे अगतिकतेचे भाव पाहवेनात. त्यांनी मनाशी काही तरी निश्चय केला.

एका उंच कट्ट्यावर चढून ते सर्वांना उद्देशून म्हणाले;

" तुम्हा साऱ्यांना येथून सुटायचं आहे ना ?"

" हो हो " साऱ्यांनी एक सुरात प्रतिसाद दिला.

" मग त्यासाठी काय करायची तुमची तयारी आहे ? " प्रो. नी आव्हान केले.



" तुम्ही म्हणाल ते करू." सारेजण ओरडले.

त्या गुहेतच जीवन घालवलेल्या म्हाताऱ्या बायकांना आणि खेळणीवाल्यालाही प्रो. नी काही चमत्कार केला तरच हे शक्य होणार याची जाणीव होती. ते मुकाट्याने बाजूला बसले.

" मग ठरलं तर." प्रो. म्हणाले. " उद्या राजेसाहेबांचा वाढदिवस आहे ना ? आपण सारे मिळून त्यांना वाढदिवसानिमित्त अशी एक भेट देऊ या की ती त्यांना जन्मभर याद राहील."

✦ ✦ ✦

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेपासून राजवाड्यात धामधूम सुरू झाली. खुद्द खाशास्वारीचा वाढदिवस म्हणजे काय साधीसुधी गोष्ट होती ? राजेसाहेबांना अभीष्ट चिंतन करायला किती तरी मंडळी येणार, त्यांचे तोंड गोड करायला नको का? शाही मुदपाकखान्यात रात्रभर निरनिराळी पक्वान्ने तयार करायचे काम चालले होते. येणारी मंडळी रिक्तहस्ताने थोडीच येणार ? "रिकाम्या हातानं आलात तर खबरदार" असा राणीसाहेबांनी त्यांना दम भरलेला असणार ह्यात राजेसाहेबांना संशय नव्हता. खाद्यपदार्थांची रेलचेल असणारच. शिवाय दिवसभर नाचगाण्याचा भरगच्च कार्यक्रम असणार. "सकाळची न्याहारी, दुपारची मेजवानी. पुन्हा तीन प्रहरचे खाणे, राजेसाहेबांच्या तोंडाला पाणी सुटत होते. नोकर त्यांना कपडे चढवत असताना राजेसाहेब खुशीत येऊन गात होते.

" मुबारक मुझको सालगिराह"

सकाळी राजवाड्याच्या प्रांगणात प्रजाजनांपैकी काही लोकनृत्यकार येऊन त्यांनी नाच सुरू केला. राजेसाहेबांनी सज्जातून तो पाहिला. नर्तकांची नाचाच्या वेळी गंमत करावी अशी राजेसाहेबांना लहर आली. त्यांनी सेवकाकडून सुरे–चाकू मागवून घेतले आणि नर्तकांच्या पायावर नेम धरून मारायला सुरवात केली. बिचारे नर्तक घाबरून तो हल्ला चुकवण्याकरता उंच–उंच उड्या मारू लागले. बरे नाच थांबवण्याची सोय नव्हती. नाही तर राजेसाहेबांची खप्पा मर्जी व्हायची आणि तसे झाले की मग सरळ अंधारकोठडी. त्यांची पाय वाचवण्याची धडपड पाहून राजेसाहेबांना खूप गंमत वाटली. त्यांनी टाळ्या पिटायला सुरवात केली.

नंतर मग राजवाड्यातल्या मध्यवर्ती दालनात मुख्य नाचाला सुरवात झाली. या नृत्यात राज्यातले सरदार-दरकदार आणि प्रतिष्ठित मंडळी सामील होती. नाचून नाचून सगळजण दमले; पण राजेसाहेब नाच थांबवायला संमती देईनात. उलट नाचाच्या गतीत थकावटीमुळे जरा कुठे धीमेपणा आला की ते टाळ्या वाजवून नाच पुन्हा जोरात सुरू करायला लावत. वाद्यवृंदातील दोघा वादकांच्या हातून जरा कुठे बदसूर झाला की त्यांनी ताबडतोब त्यांची अंधारकोठडीत रवानगी केली. पण इतके सारे करूनही पार्टीला काही रंग भरेना. राजेसाहेब वैतागून म्हणाले;

" असली कसली रद्दड मेजवानी ही ! कंटाळा आला."

राणीसाहेब खळखळून हसत म्हणाल्या,

" खरी गंमत तर पुढेच आहे. मी स्वारीसाठी काय मज्जा आणली आहे ती पहाल तर तबियत खुश होऊन जाईल."

" काय ? काय ? पाहू या तर खरे." राजेसाहेब आतुरतेने म्हणाले.

" इश्श ! भारीच अधीर स्वभाव हो इकडचा. मुला–" राणी सरकारनी जीभ चावली. आपण भलतेच काही तरी बोलून चाललो होतो याची त्यांना अगदी मोक्यावर जाणीव झाली. आपला झालेला गोंधळ लपविण्यासाठी त्यांनी शिपायाला कडक आवाजात आज्ञा केली.

" जा, रे, त्या खेळणीवाल्याला घेऊन या."

" खेळणीवाला ! " " खेळणीवाला ! " नेहमीच्या शिरस्त्या प्रमाणे राजवाड्याच्या दालना-दालनातून आरोळी गेली. थोड्याच वेळात खेळणीवाला तेथे येऊन दाखल झाला. तो एकटाच नव्हता.

त्याच्याबरोबर आठ शिपाई होते; आणि त्या शिपायांच्या खांद्यावर दोन अवजड पेटचा होत्या. त्या त्यांनी खेळणीवाल्याच्या इशाऱ्यावर उतरून ठेवल्या आणि ते धापा टाकीत उभे राहिले.

" राजेसाहेबांचा जयजयकार असो." खेळणीवाला कुर्निसात करत म्हणाला. "आपल्याला हजार वर्षांचे आयुष्य लाभो आणि त्या प्रत्येक वर्षाचे दिवस पन्नास हजार असू देत."

" बरं बरं ते सारं राहू दे." राजेसाहेब उतावळीने म्हणाले,

" आमच्या करता काय आणलंय ते पाहू दे तर खरे."

" जशी आपली आज्ञा." असे म्हणून त्याने दोन्ही पेटचांची झाकणे उघडली.

पेटचात दोन पुरुषभर उंचीच्या रंगी बेरंगी बाहुल्या होत्या. रंगी बेरंगी एक बाहुला आणि एक बाहुली.


" हात्तेच्या ! राजेसाहेब निराशेने म्हणाले, " हीच का तुमची मज्जा राणीसाहेब ? अहो अशा शेकडो बाहुल्या आपल्याकडे पडल्या आहेत की."

" भारीच बाई तुमचं हे !" राणीसाहेब नाराजीने म्हणाल्या. ' जरा सबुरीनं घ्याल तर खरं–अहो, साधेसुधे कळीचे बाहुले नाहीत हे. शाही खेळणीवाल्याची करामत तर पहा." राणीसाहेब एवढचा आवर्जून सांगताहेत त्याअर्थी त्यात विशेष काही तरी असणार हे राजेसाहेबांनी ओळखले. त्यांनी उत्सुकतेने पहायला सुरवात केली. खेळणीवाल्याने वाद्य-वृंदाला नृत्य-संगीत सुरु करण्याचा इशारा केला.

संगीत सुरू होताच राजेसाहेब आ वासून पहातच राहिले; कारण दोन्ही बाहुले पेटीतून आपले आपण उठून बाहेर आले होते

आणि त्यांनी तालावर नाचायला एवढेच नव्हे तर गायलाही सुरुवात केली होती.

राणीसाहेबांचे म्हणणे खरे होते. इतके सजीव बाहुले आतापर्यंत त्यांनी कधीही पाहिले नव्हते. राणीसाहेबांना आणि त्या खेळणीवाल्यालाही बक्षीस द्यायला हवे याची खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली.



या अजब बाहुल्यांना जवळून पहावे म्हणून राजेसाहेब आपल्या आसनावरून उठून आले; आणि त्यांनी त्यांचे जवळून निरीक्षण चालवले.

दोन्ही बाहुले इतके जिवंत दिसत होते की ते माणसासारखा श्वासोच्छ्वास करत आहेत असे वाटत होते. खेळणीवाल्याच्या कलेची तारीफ करावी तेवढी थोडी होती. ती निर्जीव बाहुली नाचतात तसे आपल्याला नाचता येते का ते पहावे म्हणून त्यांनी त्यांच्या पावलावर पावले टाकायला सुरवात केली. राजेसाहेबांचे पाहून काही धाडसी दरबारी मंडळीही पुढे येऊन तशीच नाचू लागली. सर्वजण आपले कौतुक करत आहेत हे त्या निर्जीव बाहुला-बाहुलींनाही समजले की काय कुणास ठाऊक ! त्यांचे अंगविक्षेप उत्तरोत्तर अधिकाधिक चित्रविचित्र होऊ लागले. त्यांच्या हालचालींना काही घरबंधच उरला नाही. चालत्या बोलत्या माणसांनाही अवघड वाटावे असे पदन्यास त्या करू लागल्या. ते पाहून सारेजणच फार चेकाळल्यासारखे झाले. एकच धांगडधिंगा माजला.

या साऱ्या गोंधळात या कारागिरीच्या कर्त्याकडे कुणाचे लक्षच राहिले नाही. दरबारी मंडळी राजेसाहेबांच्या बरोबरीने नाचू लागताच तो आपोआपच बाजूला ढकलला गेला. आणि तो कुठे गेला, आणि त्याने काय केले याची पंचाईतही कुणी केली नाही.

केली असती तर मात्र त्यांना त्याचे वागणे विचित्र वाटले असते. तो गर्दीतून बाजूला झाला तो आपल्याकडे कुणाचे लक्ष नाही ना याचा सावधपणे अंदाज घेऊन एका भिंतीपाशी गेला. त्याला खरे तर एवढी सावधगिरी बाळगण्याची जरूरी नव्हती; कारण जो तो त्या नव्या नवलाच्या नादातच होता.

भिंतीत एक झरोका होता. त्याच्याशी जाऊन तो उभा राहिला. झरोक्यातून आवाज आला.

“ झाली वेळ ?”

"झाली वेळ" खेळणीवाला म्हणाला. झरोक्यातून असा आवाज येणे कुणालाही चमत्कारिक वाटले असते; पण राजवाड्यात असे चित्रविचित्र आवाज नेहमीच कानावर येत आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपल्याला ते ऐकूच आले नाहीत अशी बतावणी करण्यातच शहाणपणा होता, हे साऱ्यांना अनुभवाने कळून चुकले होते. कारण बऱ्याच वेळा हे आवाज म्हणजे राजेसाहेबांची खप्पामर्जी झाल्याने खाली तळघरात कोंडलेल्या दुर्दैवी जीवांचे असत. शिवाय राजवाडा जुनाट असल्याने त्याची तक्तपोशी कुणी चालले की करकरत असे. उंच डोंगरावर असल्याने तेथे वारा सदैव वहात असे आणि तो दारे खिडक्यांतल्या फटीतून घोंघावताना कण्हणे, उसासे सोडणे असे चित्र-विचित्र आवाज काढी. या साऱ्या गोष्टींमुळे भिंतीच्या पोकळीतून झरोक्यातून आवाज आला हे कुणाच्या लक्षात आले असते तरी त्याला त्यात काही जगावेगळे वाटले नसते.

बाहुल्यांची नक्कल करण्याच्या भरात राजेसाहेबांनी एक अवघड पदन्यास करायचा अट्टाहास केला. पण आधीच त्यांचे अवजड शरीर आणि त्यात सकाळपासून पोटात ठासून अन्न भरल्याने त्यांच्यात आणखी जडता आली होती. त्यामुळे त्या नादात ते जवळजवळ कोसळलेच.

– त्या बाहुल्यांनी त्यांना सावरले म्हणून बरे. मात्र बाहुल्यांचा स्पर्श होताच राजेसाहेबाना विचित्र झाले. कारण त्या निर्जीव बाहुल्यांचा स्पर्श मात्र उबदार होता. आपली काही तरी समजण्यात चूक झाली असावी असे वाटून त्यांनी खात्री करण्याकरता पुन्हा बाहुल्यांच्या अंगाला हात लावून पाहिले.

आणि त्यांना साक्षात्कार झाला.

" द-द-दगा !" ते कसेबसे घुसमटल्या आवाजात ओरडले.

पण दुसऱ्याच क्षणी छतातून एक आकडा लावलेली दोरी खाली आली; आणि तिने राजेसाहेबांना अलगद वर उचलले. राजेसाहेब हातपाय झाडू लागले तेही असे विचित्र की कुणाला वाटावे ते नव्या प्रकारच्या नाचाचे हावभाव करताहेत. संतापातिशयाने त्यांच्या तोंडून शब्द फुटेना.

राजेसाहेबांची खरी अनवस्था लोकांच्या लक्षात आली तेव्हा ते अवाक् झाले. काय करावे ते न समजून ते अधांतरी असहाय्यपणे लोंबकळणाऱ्या राजेसाहेबांकडे फक्त पहात राहिले. जे दरबारी या हल्लकल्लोळात सामील झाले नव्हते, अजून जेवण्याखाण्यातच गुंतले होते त्यांनी उठून त्यांच्या सहाय्याला धावून जायचा प्रयत्न केला.

पण आपल्याला जागचे हलताच येत नाही याची जाणीव त्यांना त्या क्षणी झाली. आपले पाय एकमेकात गुंतवून बांधून टाकले आहेत असे त्यांना आढळून आले. हे नीच काम कुणाचे असावे म्हणून त्यांनी टेबलाखाली डोकावून पाहिले तेव्हा त्यांची बोबडीच वळली.

टेबलाखाली पाताळातून उपटल्यासारखी मुलेच मुले कुठून तरी आली होती. त्यांनी दात ओठ खाऊन मुलाना पकडण्याचा प्रयत्न केला; पण तंगड्या एकमेकांत गुंतल्यामुळे ते सारे धडाधड एकमेकाच्या अंगावर आणि जमिनीवर कोसळले मात्र. आणि ते जरा उठायचा प्रयत्न करतात तोच छपरातून जाळी येऊन त्यात ते सारेजण माशासारखे अडकले.

आणि मग अचानक पेव फुटल्यासारखी चहूकडून मुले फुटली. कुणी दारातून आली, कुणी खिडक्यातून आली. कुणी छपरातून

आली, कुणी तर चक्क भिंतीतून, कुणी जमिनीतून फुटल्यासारखी आली.

राणीसाहेबांना आपल्याला भयंकर स्वप्न पडते आहे असे वाटले. त्यांचे वाईटातले वाईट स्वप्न म्हणजे आपल्यावर असा चहूकडून मुलांचा हल्ला होणे हे ! त्या किंचाळू लागल्या.

" मुलं धरणाऱ्याला बोलवा, मुलं धरणाऱ्याला बोलवा !"

इकडे राजेसाहेबांनाही कंठ फुटला.

'शिपाई. शिपाई कुठं मेले का काय सारे? शिपायांना बोलवा."


शिपाई धावून आले खरे, पण ते एकतर हा सारा प्रकार पाहून हतबुद्ध झाले; आणि नाहीतरी असंख्य मुलांपुढे त्यांचे काही चालण्यासारखेही नव्हते. एवढ्यात राजवाड्याच्या बाहेरून मोठा जमाव चालून येत असल्याच्या आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. गावातले लोक राजवाड्यावर चालून येत होते. त्यामुळे तर शिपाई फारच गर्भगळित झाले. त्यांनी शस्त्रे खाली ठेवली. कुणी लढण्याचा मूर्खपणा केलाच तर त्याचा मुलांनी यथायोग्य समाचार घेतला.

एवढ्यात बोलावणे गेलेला मुले धरणारा तेथे येऊन पोहोचला. समोरचे दृश्य पाहून त्याचे डोळे पांढरे व्हायचीच वेळ आली.

" असा शुंभासारखा बघत उभा काय राहिलास. मेल्या." राणीसाहेब कडाडल्या. " पकड पकड या साऱ्या पोरट्यांना."

पण गारुडी झाला तरी वारूळच फुटल्यावर तो काय करणार? आपला जीव वाचवायचाच विचार पहाणार नाही का ? मुलांना पकडायचे दूर राहिले. आपणच त्यांच्या तावडीतून कसे सुटावे याचा विचार तो करू लागला.

त्याचा हा गहन विचार चालू असतानाच वरून एक जाळे आले आणि त्याच्यावर पडले. त्याने सुटायची धडपड केली तसा



तो त्या जाळ्यात जास्तच अडकत गेला. त्याने कपाळावर हात मारून घेतला. आपण स्वत:च मुले धरण्याकरता बनवलेले हे खास जाळे आहे हे त्याने ओळखले. जाळे हळूहळू वर ओढले गेले आणि तो झुंबरासारखा छताला लोंबू लागला.

सारीच बाजू आपल्यावर उलटल्याचे पाहून राजाचे दरबारी शरण आले.

या साऱ्या गोंधळात बाहुला आणि बाहुली कुठे गडप झाले होते कुणास ठाऊक? पण तेवढ्यात ते दोघेही तेथे येऊन दाखल झाले.

त्यांच्या बरोबर जेरेमी आणि जेमिमा होती. बाहुला-बाहुलींना पाहताच मुलांनी जयजयकार केला.

" प्रो. पॉटस् की जय !"

" ट्रुली ताई की जय !"

ते बाहुला-बाहुली म्हणजे प्रो. पॉटस् आणि ट्रुली होते. प्रो. नी आपले म्हणणे खरे केले होते. त्यानी राजेसाहेबांना त्यांच्या वाढदिवसाची अशी बहारदर भेट दिली होती की त्यांना जिंदगी-भर आठवण राहील.

" अरे अरे आमचा कसला जयजयकार करता ?" प्रो. चक्क लाजून म्हणाले. " तुम्ही मुलांनी आपली कामे व्यवस्थित पार पाडली म्हणून तर सारे शक्य झाले."

प्रो.च्या या विनयाने तर सारी मुले त्यांच्यावर अगदी बेहद्द खूष झाली आणि त्यांनी त्यांच्या जयजयकाराने सारा राजवाडा दणाणून सोडला.

एव्हाना तळघरातून, खोल्यातून जे बंदी केले गेले होते, त्यांची सुटका करण्यात आली होती. ते ही तेथे आले; आणि या घोषणात सामील झाले. त्या घोळक्यातून आजोबा पुढे आले. ही सारी आपल्या, आपण ज्या पोराला उपद्व्यापी समजलो त्याची कर्तब-गारी आहे हे पाहून त्यांना आनंदाचे भरते आले.

" पोरा ! पोरा ! तू-तू केलंस सारं हे ? तुला कुठं ठेवू नी कुठं नको असं मला झालं आहे." यामुळे तर प्रो.ना फारच अवघडल्या-सारखे झाले. आपली मनःस्थिती लपविण्याकरता ते मोठ्याने म्हणाले " चला. आपण घातला एवढा गोंधळ पुरे झाला. आता घरी जाऊ या."

एवढ्यात जेमिमा टाळ्या पिटत ओरडली.

" बाबा, ती पहा आपली चिट्टी-चिट्टी."

खरेच ! राजवाड्याच्या प्रांगणात रंगी-बेरंगी चिट्टी-चिट्टी दिमाखात उभी होती. प्रो.नी आत बसून बटन दाबताच, आजोबांच्या झटापटीला दाद न देणारी ती आपल्या मालकाला ओळखणाऱ्या घोडीसारखी फुरफुरू लागली. थयथयू लागली.

" हं चला. बसा सारेजण." प्रो.नी स्टीअरिंग पकडून सांगितले; पण त्यांनी तसे सांगायच्या आतच जेरेमी आणि जेमिमा आत चढून बसले होते. ट्रुली आणि आजोबाही बसल्यावर प्रो.नी साऱ्या मुलांना हात केला.

" येतो, रे, आम्ही आता बाळगोपाळांनो. सुखाने नांदा." त्यांच्या घशात आवंढा दाटला. मुलांनाही अवघडल्यासारखे झाले. पण साऱ्यांनीच ओळखले की केव्हाना केव्हा तरी प्रो.ना जाणे भाग होतेच; आणि सर्वांनी मन आवरून त्यांना निरोप दिला. डोंगराच्या उतारावरून चिट्टी-चिट्टी सुसाट वेगाने निघाली. तसे सारेजण जीव मुठीत घेऊन तिच्याकडे माना वाकवून वाकवून पाहू लागले. पण थोड्याच वेळात त्यांना माना अवघडेपर्यंत उंच कराव्या लागल्या; कारण चिट्टी-चिट्टीने डौलदारपणे अस्मानात भरारी घेतली. हळूहळू जमीन खाली खाली जाऊ लागली. जमीनीवरची माणसे ठिपक्यासारखी दिसू लागली. तरीही जेरेमी आणि जेमिमा हात हलवून निरोप घेतच राहिली.

✦ ✦ ✦

" आणि अशा रीतीने जुलुमी राजा बॉम्बर्स्टच्या जोखडाखालून देश मुक्त झाला."

प्रो. पॉटस् आपल्याच आवाजाने दचकून भानावर आले. अरेच्च्या! हीसारी कल्पित कहाणीच होती तर? तो राजा बॉम्बर्स्ट,

ती जळी-स्थळी-आभाळी सुखेनैव संचार करणारी चिट्टीचिट्टी, तो मुलांचा उद्धार हे सारे त्यांच्या सुपीक कल्पनेचेच पीक होते तर! पण असे कसे असेल. मुलांनी केलेला टाळ्यांचा कडकडाट तर अद्याप कानात घुमतोय आपल्या; परंतु खरे म्हणावे तर आजूबाजूला दुपारची रुक्ष वेळ पसरलेली होती आणि ते चिट्टीचिट्टीच्या खटाऱ्यात बसलेले होते. एवढ्यात त्यांचा उरला सुरला संशय घालवीत जेमिमा म्हणाली,

" आणि पुढे काय झाले सांगू बाबा ? "

" काय बरं " प्रो. नी विमनस्कपणे विचारले.

" मग बाबांचे ट्रुली मावशीशी लग्न झाले; आणि ते सुखाने संसार करू लागले." जेमिमा टाळ्या पिटत म्हणाली.

" छे : ! छे : ! भलतंच काहीतरी ! " प्रो. खाडकन् भानावर येत म्हणाले. त्यांनी भांबावून ट्रुलीकडे पाहिले. तिचे लक्ष दुसरीकडेच दिसले. तिने मुलांची बडबड ऐकली नाही हे पाहून प्रो. चा जीव भांड्यात पडला. हो. नाहीतर तिचा भलताच गैरसमज व्हायचा. प्रो. च्या या विचारांची साखळी जेमिमाच्या तक्रारखोर सुरामुळे तुटली.

" भलतंच काय त्यात बाबा. " ती फुरंगटून म्हणत होती;

" बाई आम्हाला छान-छान गोष्टी सांगतात त्यात साऱ्यांचा शेवट असाच असतो. होय की नाही रे दादा ?"

" हो. ना." जेरेमीने तिची री ओढली.

" तुमच्या त्या बाईला लोकांची लग्ने लावण्याशिवाय दुसरा काही धंदाच दिसत नाही. जा आता पसारा आवरायला लागा." प्रो. वैतागाने उद्गारले.

मुले बिचारी हिरमुसली होऊन निघून गेली. प्रो. ना त्यांच्या लुटूलुटू चालणाऱ्या आकृतीकडे पाहून वाईट वाटले. त्या बिचाऱ्या आई वेगळ्या पोरांनी अशी आडमार्गाने आपली आईची तहान भागवायचा प्रयत्न केला त्यात त्यांचे काय चुकले. आपण त्यांना रागवायला नको होते; पण-पण ट्रुलीला काय वाटले असते ?

" उगीच रागावलात त्यांच्यावर " ट्रुलीच्या आवाजाने प्रो. दचकले, " हो-तुम्ही म्हणता तसंच झालं असं त्यांना सांगितलं असतं तर काय बिघडलं असतं ?"

प्रो. सीटची स्प्रिंग उडाल्यासारखे उंच उडाले. अरेच्च्या ! म्हणजे हिने सारी बडबड ऐकली होती काय ? प्रो. च्या अंगाला दरदरून घाम सुटला.

" छे: ! छे: ! भलतंच काही तरी." ते गडबडून कसनुसे हसत म्हणाले, " तू - - तुम्ही मुलांची वटवट लक्षात घेऊ नका त्यांना काय कळतंय. काय मनात येईल ते बडबडतात झालं."

" म्हणजे तुमच्या मनात तसं काही नाही. मग बोलणेच खुंटले." ट्रुली धीराने म्हणाली.

प्रो. चमकले; पण दुसऱ्याच क्षणी त्यांनी स्वतःला आवर घातला.

" हे पहा, ट्रुली." ते धीमेपणाने म्हणाले. " मी संशोधक असलो तरी काही काही गोष्टी असाध्य आहेत हे मलाही कळते. तू थोरा मोठ्यांची लेक. मी हा असा. विधुर, दोन मुलांचा बाप. आणि शिवाय अष्टौप्रहर सर्वथैव असंभवनीय असा शोध लावण्यात गुंतलेला. जाऊ दे झालं."

" तुम्ही असाल महान संशोधक.' ट्रुली चिडून म्हणाली. "पण तुम्हाला तुमची किंमत कळत नाही; आणि बायकांचं मन त्याहून कळत नाही."

प्रो. आ वासून पहात राहिले. अरेच्च्या! या दोन विषयावर आपण अजिबात विचार केला नाही हे खरंच की. आता या किंमती बरोबर दाखविणारा एखादा दर्शक बनवण्याच्या कामाला हात घालायला हवा.

" तुमचं लक्ष आहे कुठं. गेलं असेल पुन्हा प्रयोगशाळेत." ट्रुलीच्या वैतागपूर्ण स्वराने त्यांना पुनरपी व्यवहाराच्या जगात आणले. " तर मी काय सांगत होते तुमचे बाबा आणि माझे बाबा एकाच वेळी लष्करात होते; आणि खांद्याला खांदा लावून लढले आहेत हे आहे तुम्हाला ठाऊक ? उगीच तुम्ही स्वतःला कमी लेखता ? आणि त्या दिवसानंतर कारखान्यात फिरकलात तरी का ? अहो, तुमची मिठाई कुत्र्यांना फार आवडली आणि बाबांनी तुम्हाला त्याबद्दल हजारो रुपये देण्याचे ठरवले आहे हे कुठून ठाऊक असणार ? आणि बायकांचं मन--पण जाऊं द्या. तो तुमचा संशोधनाचा विषयच नव्हे."

ट्रुली बोलतच राहिली. हे सर्व ज्ञान प्रो. ना नवीन होते. शास्त्राची गहन गुपिते आणि यंत्रांची गुंतागुंतीची रहस्ये लीलया समजू शकणाऱ्या त्यांच्या तल्लख मेंदूलाही या साऱ्या गोष्टींचा नीटसा अर्थबोध होत नव्हता.

हे सारे खरे असेल तर - तर तर दुनियेचा रंगच बदलणार होता.

" हे सारं खरं–खरं सांगतेस तूं. प्रो. नी तिचा हात हातात घेऊन आवेगाने विचारले. आत्तापर्यंत धीटपणाने बडबड करणारी ट्रुली एकदम अवाक् होऊन खाली पाहू लागली.

" अरे पोरांनो." प्रो. मुलांना हाक मारत म्हणाले,

" तुमचंच म्हणणं खरं आहे रे. गोष्टीचा शेवट तुम्ही म्हणता तसाच झाला बरं का !"

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा:
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २९९ दिनांक ......
विषय किशोर क्र. २७८

BVBK-0400299

BVBK-0400299